उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थासाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्पेशल OFFER
STOCK CLEARANCE
ONLY ON SELECTED RANGE
20 - 50 % DISCOUNT
जरीवाला
कापड बाजार, अहमदनगर
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १६.०१.२०२५ | अंक नं. २६७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# नगरमधील महा ई सेवा केंद्रातून चार लाख रुपयांची रोकड लंपास

नगर – शहरातील मंगलगेट परिसरात गजबजलेल्या चौकातील महा ई सेवा केंद्र व मनी ट्रान्सफर केंद्राच्या छताचा पत्रा उचकटवून चोरट्याने या केंद्रात प्रवेश करत त्यातील टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेली सुमारे साडेतीन ते चार लाखांची रोकड, १ महागडा मोबाईल चोरून नेल्याची घटना १६ जानेवारीला सकाळी उघडकीस आली आहे. चोरी करणारा एक चोरटा केंद्रातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत असून, त्याने तोंडाला फडके गुंडाळलेले असल्याचे दिसून आले.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, शहरातील मंगलगेट परिसरात असलेल्या मुख्य चौकात खालिद शेख व रिजवान शेख यांच्या मालकीचे इरफान गोल्डन टच नावाचे महा ई सेवा केंद्र आहे. या केंद्रात ते मनी ट्रान्सफर सेवाही पुरवतात. याशिवाय मोबाईल विक्री, इलेक्ट्रिक साहित्याचीही विक्री करतात. १५ जानेवारी रोजी दिवसभर जमा झालेली रोकड त्यांनी रात्री केंद्रातील टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेली होती. ही रक्कम सुमारे साडेतीन ते चार लाखांची होती.

## मंगलगेट परिसरातील घटना, एक चोरटा सीसीटीव्हीत कैद



शहरातील मंगलगेट परिसरात इरफान गोल्डन टच नावाचे महा ई सेवा केंद्रात चोरट्याने चोरी करण्यासाठी उचकटलेला छताचा पत्रा, तसेच केलेली उचकापाचक दिसत असून, पळून जाण्यासाठी दुकानाच्या मागील बाजूने छतावरून खाली सोडलेली साडी तिसऱ्या छायाचित्रात दिसत आहे. (छाया – बबलू शेख)

दुकान मालक आणि कामगार हे रात्री दुकान बंद करून घरी गेले. गुरुवारी सकाळी १० च्या सुमारास ते नेहमीप्रमाणे दुकान उघडण्यासाठी आले. त्यांनी दुकान उघडल्यावर आतमध्ये सर्वत्र उचकापाचक झाल्याचे दिसून आले. त्यांनी टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेली रोकड पाहिली असता ती दिसून आली नाही. त्यानंतर त्यांनी दुकानातील सीसीटीव्ही फुटेज ची पाहणी केली असता तोंडाला कापड गुंडाळलेला एक चोरटा पहाटेच्या सुमारास छताचा पत्रा उचकटवून आत येताना आणि उचकापाचक करून टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेली रोकड चोरुन नेताना दिसून आला.

चोरट्याने दुकानातील रोकड चोरल्यानंतर पुन्हा इमारतीच्या छतावर गेला. तेथे वाळत घातलेली साडी दुकानाच्या मागील बाजूने खाली सोडून आणि एक टोकवर लोखंडी अँगलला बांधून त्या साडीच्या सहाय्याने दुसऱ्या मजल्यावरून खाली उतरला असल्याचे दिसून आले. याबाबत दुकान मालक रिजवान शेख यांनी तोफखाना पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. दुपारी उशिरापर्यंत याबाबत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

पाहिजेत
* ऑफिस बॉय – जागा १
ऑफिसमधील कामाचा अनुभव आवश्यक
* पत्रकार/शहर वार्ताहर – जागा १
संपादकिय क्षेत्रातील कामाचा अनुभव आवश्यक
* व्हिडिओ एडिटर – जागा १
युट्युब, इंस्टाग्राम मधील व्हिडिओ एडिटिंगचा अनुभव आवश्यक
* न्युज अँकर – जागा १
न्युज चॅनल मधील अनुभव आवश्यक
अर्जासह समक्ष भेटा- वेळ सायंकाळी ५ ते ८
दैनिक नवा मराठा कार्यालय
कै. आचार्य गुंदेचा चौक, गंजबाजार, अहिल्यानगर

आता प्रत्येक शुक्रवार व शनिवार
मोफत तपासणी उपचार
नववर्षाच्या स्वागता निमित्त रुग्णांच्या व्याधी कमी करण्या करिता
नोबल हॉस्पिटल परिवारातर्फे
अनोखी आरोग्य योजना...
दर शुक्रवारी
मुत्रविकार व किडनीविकार तज्ञ, शल्यचिकित्सक
डॉ. अमेय सांगळे
(किडनी व मूत्रविकार तज्ञ)
MBBS, M.S. (General Surgery), Mch (Urosurgery)
यांची मोफत ओपीडी
दर शनिवारी
इतर विविध व्याधींवर उपचारा करीता खालील तज्ञ उपलब्ध
डॉ. राघव पारगांवकर
(मेंदू व मणके विकार सर्जन)
MS Gen. Surgery, Mch Neuro Surgery
डॉ. अद्वैत गिते
(मेंदू विकार तज्ञ)
MD Medicine, DM Neurology
डॉ. सुशांत घुमरे
(जॉईंट रिप्लेसमेंट सर्जन)
MBBS, MS, (Ortho), DNB (Ortho), MNAMS
डॉ. प्रिती थोरात
(नेत्रविकार तज्ञ)
MBBS, DOMS, IOC
डॉ. यमिता साखरे-जाधव
(किडनी विकार तज्ञ)
MBBS, MD (Medicine), DNB Nephrology)
* अत्याधुनिक उपचार सुविधा * ह्रदयरोग विभाग * मेंदू विकार निदान व शस्त्रक्रिया विभाग
* किडनी व मूत्र विकार उपचार विभाग * पोट व आतडे विकार आणि जनरल सर्जरी विभाग
* अस्थिरोग, जॉईंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया विभाग * नेत्ररोग उपचार व शस्त्रक्रिया विभाग
* पुर्णवेळ अतिदक्षता विभाग तज्ञ उपलब्ध
नूतन वर्षाभिनंदन २०२५
अत्यंत अद्यायावत सेवा सुविधा
सर्व प्रमुख कंपन्यांसाठी कॅशलेस सुविधा
नगर जिल्ह्यातील सर्वप्रथम, प्रशस्त व परिपूर्ण आरोग्य मंदिर
एशियन नोबल हॉस्पिटल प्रा लि.
प्रेमदान चौक, मनमाड रोड, अहिल्यानगर
0241 - 2421290-91-92, 0241 - 2421911-12-13
मोफत उपचार अधिक माहितीसाठी संपर्क : 86055 52266
Dishan

SONI Since 1965
TILES
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

* दशक्रिया विधी *
ज्योत अनंतात विलिन झाली
स्मृती आठवणींनी दाटुन आली
भाव सुमनांची ओंजळ भरुनी
वाहतो आम्ही श्रध्दांजली...

स्व. चंद्रकांत किसनराव भोसले
यांचे दिनांक ९/१/२०२५ रोजी दु:खद निधन झाले. त्यांचा
• दशक्रिया विधी •
शनिवार दि.१८/१/२०२५ रोजी सकाळी ८ वा. नालेगांव, अमरधाम येथे होईल.
* शोकाकुल *
राजेंद्र किसनराव भोसले (भाऊ)
रमाकांत चंद्रकांत भोसले (मुलगा)
सागर चंद्रकांत भोसले (मुलगा)
विशाल राजेंद्र भोसले (पुतण्या)
सौ. रोहिनी विजय वाघमारे (मुलगी)
समस्त भोसले परिवार

41st ANNIVERSARY
वर्धापनदिन दि. 19 जानेवारी 2025
रेडिमेड व कापड खरेदीवर
25% डिस्काऊंट
ऑफर फक्त दि. 17 18 19 जानेवारी 2025 पर्यंत
फॅब्रिक आपल्या मनाप्रमाणे कोठेही शिवून घेऊ शकता.
४१ वर्षापूर्वी सुरु झालेल्या या प्रवासात आपण दिलेली अमूल्य साथ व विश्वासाबद्दल आम्ही ग्राहकांचे व हितचिंतकांचे ऋणी आहोत.
डि.चंद्रकांत
फॅब्रिक अँण्ड मेन्स वेअर
चितळे रोड, अहमदनगर.
7083969199

बोअरची किंवा हौदावरची मोटर
खराब झाली आहे!
मग वाट कसली बघताय,
आजच अभय सेल्सशी संपर्क साधा..
* खात्रीशीर काम तेही योग्य दरात
मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
• 9145008009 / • 9822542011

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## प्रेम म्हणजे तरुण मनाचा स्थायीभाव

प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं प्रेम असतं. पाडगावकरांनी तुमच्या माझ्या मनातलंच हे सांगून ठेवलंय.

मला तर नेहमीच वाटतं प्रेमाचा वय, जात, श्रीमंती इ. गोष्टींशी काहीही संबंध नाही. प्रत्येकाने आपलं हृदय प्रेमाने भरलेले ठेवले की तारुण्य येतेच!

कॉलेजमधील एका युवकाला याबाबत सांगतांना प्राचार्य म्हणतात की, एक मित्र या नात्याने तुला सांगतो - एखाद्या युवतीबद्दल आकर्षण वाटणं, तिच्या प्रेमात सारं झुगारून द्यावसं वाटणं 'हा तरुण मनाचा' स्थायीभाव आहे. त्याबद्दल मी कोणालाच दोष देणार नाही. पण ज्याला प्रेम व वासना यातल्या सीमारेषा वेळीच ओळखता येतात आणि आयुष्याला कीड लावणारा मोह टाळता येतो, त्याच्यापुरताच हा स्थायीभाव निकोप आहे, सुंदर आहे.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

निकोप प्रेमाच्या चौकटीत चोरटे स्पर्श असतात. माफक प्रमाणातली थापाथापी बसू शकते. हिंडणं फिरणं बसू शकतं आणि क्वचितच कधीतरी एखादी पायरी ओलांडली तर तेही बसवता येतं! पण या चौकटीला वासनेची कीड लागली तर निकोप चौकट सडत किडत गळून पडते.

तात्पर्य, प्रेम हे सुंदर जीवनाचं सर्वांगानं सुंदर, समृद्ध पण अल्प स्वरूप आहे. शक्यतो आयुष्याच्या शेवटपर्यंत प्रेमाने भारावलेले, ओथंबलेले मन, हृदय इतकेच काय बुद्धीसुद्धा लाभली तर जीवनाची प्रेमकथा फुलेल, जीवन आनंदी राहून सफल होईल.



# महापालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांच्या सर्वेक्षणाला खासगी संस्थेमार्फत सुरुवात

### नागरिकांनी सहकार्य करावे : प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांचे आवाहन



महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे खासगी संस्थेमार्फत सर्वेक्षणासाठी नेमलेले कर्मचारी.

नगर - अहिल्यानगर शहर हद्दीतील सर्व मालमत्तांचे महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. याद्वारे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व जागा व मालमत्तांची, इमारतींची, घरांची मोजमापे घेऊन मूल्यांकन करण्यात येणार आहे. मार्च अखेरीपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, सर्व्हेक्षण करताना अडचणी येत आहेत. नागरिकांनी सर्वेक्षण करणाऱ्या खासगी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे. त्यांच्याकडे ओळखपत्र असून ते तपासून त्यांना सर्वेक्षणासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

यशवंत डांगे यांनी गुरुवारी महानगरपालिकेत सर्वेक्षणाचा आढावा घेतला. अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सर्व जमीन व इमारती यांचे सर्वेक्षण करुन आवश्यक माहिती संकलीत करणे, मुल्यांकन व आवश्यक तांत्रीक सेवा संगणकीकरण करणे, विविध आज्ञावली विकसीत करुन इतर कामे करणे, यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार महानगरपालिका प्रशासनाकडून मे. सी. ई. इन्फो सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड यांना कार्यारंभ आदेश देण्यात आला. आहे. मालमत्तेची डिजीटल छायाचित्रे, जिओ टॅगींग, तसेच मालमत्तेच्या अंतर्गत मोजमापांसाठी, त्यांचे कारपेट व बिल्टअप क्षेत्र डीजीटल उपकरणाद्वारे मोजण्यात येणार आहे. महानगरपालिकेचे वसुली लिपिक व मे. सी. ई. इन्फो सिस्टीम लिमिटेड यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत हे काम केले जात आहे. त्यासाठी वसुली लिपिक व वसुली मदतनीस आदींची नियुक्ती करण्यात आली आहे.

खासगी संस्थेचे कर्मचारी असल्याने काही नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊन सर्वेक्षणात अडथळे येत आहेत. मालमत्ताधारकांनी मालमत्ता सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची ओळख तपासून त्यांना सहकार्य करावे. त्यांना आवश्यक ती माहिती द्यावी. सर्वेक्षणाचे काम हे अहिल्यानगर महानगरपालिका विनामुल्य करत असून यासाठी कुठलेही शुल्क आकारण्यात येणार नसल्याचे महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सर्वेक्षणामुळे सर्व मालमत्तांना कर आकारणी होईलच. मात्र, यामुळे मालमत्ताधारकांना आवश्यक असलेल्या मुलभुत सुविधांमध्ये सुधारणा करणे शक्य होणार आहे. या सर्व्हेक्षणाबाबत अथवा सर्वेक्षण कामास येणाऱ्या कर्मचारी, प्रतिनिधींबाबत कुठलीही तक्रार असल्यास amc_anrrediffmail.com व amc.revision2gmail.com या ई-मेल आयडी वर तक्रार करावी.

याबाबत सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी विनायक गंगाधर जोशी यांच्याशी ९८२२०७६८६५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करता येईल, असेही आयुक्त यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

# टयुबलर पोलवरील बंद लाईटस चालू न केल्यास २६ जानेवारीला महानगरपालिकेत आत्मदहन



मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देताना माजी नगरसेवक तायगा शिंदे.

नगर - शहरातील नागरिक हे तोफखाना पोलिस स्टेशन ते भिस्तबाग चौकादरम्यान तिरंगा लाईट पाहण्यासाठी नेहमी येत होते. सदर परिसर चांगल्या प्रकारे सुशोभित झाल्याने नागरिक आनंद व्यक्त करत होते. मात्र गेल्या काही महिन्यांपासून टयुबलर पोलवरील तिरंगा एलईडी लाईटस बंद पडल्या आहेत. या लाईटस तात्काळ चालू करण्यासाठी नागरिक वेळोवेळी मागणी करत आहे. मनपाने २२ जानेवारीपर्यंत या तिरंगा एलईडी लाईटस चालू न केल्यास मी प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी रोजी महानगरपालिका येथे आत्मदहन करणार असल्याचा इशारा निवेदनातून आयुक्त यशवंत डांगे यांना माजी नगरसेवक तायगा शिंदे यांनी दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, वॉर्ड क्र.५ मधील तोफखाना पोलिस स्टेशन ते भिस्तबाग चौकापर्यंत टयुबलर पोलवरील तिरंगा एलईडी लाईटस बसवण्यात आल्या होत्या. त्या पोलवरती जाहिरातीचे बोर्ड लावलेले आहेत. त्या दिवशीपासुन ७२ पोल वरील तिरंगा लाईटस बंद झाल्या आहेत. त्या बंद लाईट चालू करण्यासाठी उपोषण, आंदोलन, आत्मदहन इत्यादी मार्गाचा अवलंब करण्यात आलेला आहे. तरी महानगरपालिकेतील अधिकारी यांनी ७२ पोलवरील एलईडी लाईट चालू केलेली नाही. त्या गोष्टीला ७ ते ८ महिने झालेले आहेत. तरीसुध्दा तिरंगा एलईडी लाईटस चालू झालेल्या नाहीत. पंतप्रधान मोदी व माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घर घर तिरंगा ही मोहिम १५ ऑगस्ट २०२४ चे तीन ते चार दिवस अगोदर सुरू केलेली होती. महापालिकेचे अधिकारी यांनी सर्व पोलवरील तिरंगा लाईटस चालू केलेल्या नाहीत. या लाईटस चालू न केल्यास प्रजासत्ताक दिनी महापालिकेत येथे आत्मदहन करणार असल्याचा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांना दिला आहे.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

नगर - जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये २२ जानेवारी २०२५ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे.

सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# पोलिसात तक्रार दिल्याच्या कारणावरून बेदम मारहाण

### बोल्हेगाव उपनगरातील घटना, चौघा जणांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - मागील भांडणाच्या कारणावरून झालेल्या वादाची तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याचा मनाचा राग धरून चौघांनी एकास शिवीगाळ दमदाटी करीत लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. ही घटना नगर मनमाड रोडवरील बोल्हेगाव परिसरातील गांधीनगर येथील जय भवानी चौक येथे १४ जानेवारी रोजी घडली.

याबाबतची माहिती अशी की अशी की विठ्ठल शिरसाठ (वय २४, रा. गांधी किराणा जवळ, गांधीनगर, बोल्हेगाव) याचे जमीर पठाण, आसिफ शेख, अजू सय्यद, व अभिषेक लांडगे (सर्व रा. गांधीनगर, बोल्हेगाव) यांच्याशी भांडण झाले होते. त्या भांडणाबाबत शिरसाठ याने तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. ती तक्रार दिल्याच्या कारणावरून चौघांनी आशिष शिरसाठ यास शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. मारहाणीत आशिष शिरसाठ हा जखमी झाला.

याप्रकरणी आशिष शिरसाठ यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी चौघांविरुद्ध ११५ (२) ३५२, ३५१, (२) (३) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.



संघ लोकसेवा आयोगातर्फे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्थेवर यश राशिनकर यांची निवड झाल्याबद्दल सावेडी उपनगरात सिनर्जी अॅक्डेमी तर्फे सन्मान करण्यात आला. याप्रसंगी डॉ. दत्ता पोंदे, विजयकुमार पोंदे, आशुतोष राशीनकर, उद्योजक विश्वनाथ पोंदे आदी. (छाया- विजय मते)

## श्रीमती पुष्पलता बऱ्हाटे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - घोडेगाव येथील रहिवासी श्रीमती पुष्पलता रावसाहेब बऱ्हाटे (वय ७४) यांचे १३ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर घोडेगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नितेश बनसोडे यांच्या त्या सासू होत. रणजित, राजेंद्र, रागिणी, रंजना यांच्या त्या मातोश्री होत.

## निवृत्त अधिकारी प्रमोद बांगर यांचे निधन



नगर - कवडेनगर आलमगीर येथील रहिवासी व लेबर कोर्टमधील निवृत्त अधिकारी प्रमोद मुरलीधर बांगर (वय ६१) यांचे १५ जानेवारी रोजी रात्री दुःखद निधन झाले.

त्यांच्या मागे दोन मुली, एक मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार DCB बँक नावनागपूर, एमआयडीसी शाखेचे सागर प्रमोद बांगर यांचे ते वडील होत.

# शेतकरी आंदोलनाकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याच्या निषेधार्थ २० जानेवारीला स्वतंत्र भारत पक्षाचे राज्यव्यापी लाक्षणिक उपोषण

नगर - पंजाबमधील शेतकरी आंदोलनाला केंद्र सरकार देत असलेल्या वागणुकीचा निषेध करण्यासाठी व सरदार डल्लेवाल यांनी उपोषण सोडावे यासाठी २० जानेवारी रोजी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राज्यव्यापी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी दिली आहे.

एक वर्ष होत आले आहे, पंजाब आणि हरियाणा राज्यांच्या सीमेवर शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. शेती व्यवसायातील अनिश्चितता व असुरक्षितता पाहता या शेतकरी संघटनांनी उत्पन्नाची हमी मागितली आहे. त्यासाठी, कोणीही किमान आधारभूत किमती पेक्षा कमी दराने शेतीमाल खरेदी करू नये असा कायदा करण्यात यावा, शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करावे, भूमी अधिग्रहण कायदा व इतर काही मागण्या आहेत. आपले म्हणणे सरकार दरबारी मांडण्यासाठी हे शेतकरी दिल्लीला जाण्यासाठी पंजाब मधून निघाले मात्र हरियाणा राज्याच्या सरहद्दीवर त्यांना रोकण्यात आले आहे.

कृषीमंत्र्यांनी त्यांच्याशी चर्चा करून प्रश्न सोडवावा अशी त्यांची रास्त अपेक्षा आहे. अकरा महिने झाले तरी केंद्र सरकार या आंदोलनाची दखल घेण्यास तयार नाही असे पाहून भारतीय किसन युनियन (अराजनैतिक) या संघटनेचे अध्यक्ष सरदार जगजितसिंग डल्लेवाल यांनी उपोषणाला सुरुवात केली. आज पन्नास दिवस उलटून गेले तरी सरकार बोलणी करण्यास तयार नाही. पन्नास दिवसात त्यांनी पाणी सोडून काहीच ग्रहण केलेले नाही. आता पाणी सुध्दा उलटी द्वारे बाहेर येत आहे.

सत्तर वर्षाचे, कॅन्सर पीडित सरदार डल्लेवाल शेतकऱ्यांसाठी आपले प्राण त्यागण्यास तयार झाले आहेत. तेथे झालेल्या गोळीबारात एक तरुण शेतकऱ्याने आपला जीव गमावला आहे. सरकारने केलेल्या कारवाईत अनेक जखमी झाले आहेत, काहींची दृष्टी गेली आहे.

एका शेतकरी आंदोलनाला ज्या पद्धतीने सरकार वागणूक देत आहे हे अतिशय निषेधार्ह आहे. शांततेच्या मार्गाने अतिशय अहिंसक पद्धतीने हे आंदोलन सुरू आहे. आंदोलन चिरडण्यासाठी सरकार आंदोलन हिंसक होण्याची वाट पाहत आहे.

सध्या सुरू असलेल्या आंदोलनाच्या पंधरा मागण्या आहेत. त्यापैकी बऱ्याच मागण्या सर्वांना मान्य आहेत. काही मागण्या बाबत सहमती नाही पण शेतकरी आंदोलकांचे म्हणणेच सरकार ऐकून घेणार नसेल तर मार्ग कसा निघेल? काय हरकत आहे पंतप्रधान किंवा कृषी मंत्र्यांनी त्यांच्या शिष्टमंडळाबरोबर चर्चा करायला? जे शक्य असेल ते मंजूर करा नसेल ते का करता येत नाही ते समजून सांगावे, असे मत घनवट यांनी निवेदनात मांडले आहे.

सरकारला देशातील शेतकरी चळवळ मोडीत काढायची आहे. आज पंजाबच्या शेतकऱ्यांना चिरडतील, उद्या महाराष्ट्रातल्या, देशात शेतकरी चळवळ बदनाम करण्याचे हे षडयंत्र आहे. आता पूर्ण भारतातील शेतकऱ्यांनी एकजूट होऊन सरकारच्या या वर्तणुकीचा निषेध करायला हवा.

पंजाबच्या आंदोलनातील सर्व मागण्यांना सर्व शेतकरी संघटना समर्थन देऊ शकत नसल्या तरी केंद्र शासनाचा निषेध मात्र नक्की करायला हवा. या साठी २० जानेवारी रोजी सर्व जिल्हाधिकारी कार्यालय समोर सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत एक दिवस लाक्षणिक उपोषण करण्याचे जाहीर केले आहे. या आंदोलनात सर्व शेतकरी संघटना, सर्व पक्ष व शेतकरी हितेशी चळवळींनी भाग घ्यावा अशी अपेक्षा घनवट यांनी व्यक्त केली आहे.

देशभर होत असलेल्या शेतकरी आत्महत्या कायमच्या थांबवायचा असतील व सरकारच्या दडपशाहीला पायबंद घालायचा असेल तर भारतातील सर्व शेतकरी संघटना व शेतकऱ्यांच्या हितचिंतकांनी एकदा आपली एकजुटीची ताकद दाखवणे अत्यावश्यक आहे. यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन अनिल घनवट, स्व.भा.प. प्रदेशाध्यक्ष मधुसूदन हरणे, स्व.भा.प. महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा, सीमा नरोडे यांनी केले आहे.

## सय्याना कोलपेक यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील सय्याना किसन कोलपेक (वय ८८, रा.सिद्धीविनायक चौक, तोफखाना) यांचे १५ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. किशोर कोलपेक यांचे ते वडील होत. पद्मशाली वधू-वरचे ते मार्गदर्शक होते.

## बन्सी खेडकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील बन्सी गणपत खेडकर (कर्नल) (वय ७०, रा.चिचोंडी पाटील) यांचे १६ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. रामभाऊ खेडकर यांचे ते वडील होत. त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

## डॉ. शिवाजी मेहेत्रे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - अकोळनेर येथील माजी सरपंच ह.भ.प. डॉ.शिवाजी विष्णू मेहत्रे (वय ८५) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या मागे दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, नातू असा परिवार आहे. कृषी विभागातील कृषी पर्यवेक्षक संजय मेहत्रे यांचे ते वडील होते.



युवा कार्य प्रशिक्षणार्थींना कायमस्वरुपी रोजगार, स्वयंरोजगार उपलब्ध करून द्यावा या मागणीचे निवेदन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले.

# युवा कार्य प्रशिक्षणार्थींना कायमस्वरुपी रोजगार, स्वयंरोजगार उपलब्ध करून द्यावा

नगर - मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजनेंतर्गत ११० प्रशिक्षणार्थी महानगरपालिकेत वेगवेगळ्या विभागामध्ये आस्थापनावर ६ महिन्याच्या कार्यकाळाचे प्रशिक्षण घेत आहेत. तसेच प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर आम्हाला कायम स्वरूपी करावे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर इच्छुक उमेदवार ज्या ठिकाणी काम करत असतील तर त्यांना तिथेच कायमस्वरूपी करू असे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कौशल्यविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी म्हटले आहे.

त्यानुसार प्रशिक्षणार्थीला कायमस्वरुपी करण्यात यावे, सहा महिन्याचे यशस्वी प्रशिक्षण झाल्यानंतर आम्हास कायमस्वरुपी रोजगार, स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात यावे, युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थींना किमान वेतन कायद्यानुसार किमान दरमहा वेतन वाढून देण्यात यावे, तसेच प्रशिक्षण कालावधी वाढवून देण्यात यावा. नियमानुसार काम आणि दरमहा किमान पाच तारखेच्या आत विद्यावेतन मिळावे, अशी मागणी मनपातील १०० प्रशिक्षणार्थींनी आ. संग्राम जगताप आणि मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनातून केली

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेण्याच्या आदल्या दिवशी केलेल्या भाषणात लाडका भाऊ योजना आणि लाड़की बहिणी योजना आणि त्यांना दिलेली आश्वासन यांना प्राथमिकता दिली जाईल असे म्हणून युवक आणि युवतीच्या आशा पल्लवीत केल्यात. त्यामुळे युवक आणि युवतींना कायमस्वरुपी नोकरी किवा रोजगार उपलब्ध करून महाराष्ट्राला उन्नत करावे अशी मागणी करण्यात आली.

# टपरीचालकाला गुटखा, पानमसाला पुरवण्यासाठी आलेल्या दोघांना पकडले

### दीड लाखांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



राज्यामध्ये प्रतिबंधीत असलेला गुटखा, पानमसाला विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगणाऱ्या तिघांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर - नगर-मनमाड महामार्गावरील नांदगाव (ता.नगर) येथील नांदगाव येथील पानटपरी चालकाला गुटखा, पानमसाला पुरवण्यासाठी आलेल्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. त्यांच्याकडून १ लाख ५१ हजार ९६० हजार रुपये किमतीचा गुटखा व पान मसाल्याचा साठा जप्त केला असून या दोघांसह पानटपरी चालक अशा तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोईन जावेद सय्यद (वय २१), मुजाहिद जावेद सय्यद (वय २४, दोघे रा. कोठला, अ.नगर तसेच टपरी चालक सुरज आण्णासाहेब भगत (वय २३, रा. शिंगवे, ता. नगर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना गोपनीय माहिती मिळाली होती की, नांदगाव येथील हॉटेल खालसा पंजाब जवळ असलेल्या एम. बी.पान स्टॉल या टपरीमध्ये बसलेल्या इसमास दोन इसम मोटारसायकलवरुन महाराष्ट्र राज्यामध्ये प्रतिबंधीत असलेला गुटखा, पानमसाला विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली.

त्यामुळे त्यांनी तात्काळ पथकातील कर्मचारी पो.कॉ. विशाल तनपुरे, पो.हे.कॉ. संतोष लोढे, गणेश लोंढे,पो.ना. सोमनाथ झांबरे, शिवाजी ढाकणे, रणजित जाधव, चालक पो.हे.कॉ. उमाकांत गावडे यांना कारवाईसाठी पाठविले. या पथकाने तेथे जावून सापळा लावत तिघांना पकडले. त्यांच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त करत त्या तिघांच्या विरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### केसांसाठी नैसर्गिक मॉइश्चरायझर

नारळाचे दूध हे नैसर्गिक मॉइश्चरायझर आहे आणि टाळूचे पोषण करण्यास मदत करते. नारळाच्या दुधामध्ये लॉरिक सिड, व्हिटॅमिन ई आणि इतर पोषक घटक असतात जे केस मजबूत आणि निरोगी बनवण्यास मदत करतात. हे टाळूला आर्द्रता प्रदान करते, केस मऊ करते आणि केस तुटण्यापासून प्रतिबंधित करते.

## पाककला

### शेंगदाणा गजक

**साहित्य** : शेंगदाणे, तूप, गूळ, आवश्यकतेनुसार पाणी

**कृती** : सर्वात आधी शेंगदाणे भाजून त्याचे साल काढून घ्यावे. आता कढईमध्ये तूप गरम करून गूळ घालावा व थोड्या प्रमाणात पाणी घालून ढवळावे. तसेच गुळाचा पाक तयार झाल्यानंतर यामध्ये शेंगदाणे घालावे. आता ताटाला तूप लावून त्यामध्ये हे मिश्रण काढावे. व थंड होण्यास ठेवावे. आकारानुसार याच्या वड्या पाडाव्यात.

## वास्तू

### कार्यालयातील व्यवस्था

✽ दक्षिणेत कर्जप्रस्ताव तपासणी व पुनर्मूल्यांकन अधिकाऱ्यांना नक्की स्थान द्यावे.

✽ अग्नेय दिशेत एअर कंडिशनिंग यंत्रणा, जनरेटर, बॅटरी इन्व्हर्टर व्यवस्था, कॉम्प्युटर सर्व्हर, कँटिन अथवा पँट्री तसेच एकत्र भोजन व्यवस्था असावी.

## सल्ला

तर्जनी किंवा मधल्या बोटावर अंगठी घालावी. कासवाचा चेहरा तुमच्या दिशेने असावा. अंगठी घालताना ओम विष्णु या मंत्राचा जप करा.

## सौंदर्य

डोळे मोठे असतील तर फक्त डोळ्यांच्या खालच्या कडेला काजळ लावावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५

**संकष्ट चतुर्थी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, मघा १२|४५, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : अवाजवी खर्च टाळाल. नेमके बोलाल. कामाच्या ठिकाणचे वरिष्ठांचे दडपण आणि घरातील कलह तणाव वाढवू शकतो.

**वृषभ** : सोयी सवलतींसाठी खर्च वाढेल. हाताखालील व्यक्तींना मदत करावी लागेल. घरातील ताणतणावामुळे तुम्ही चिडचिड कराल.

**मिथुन** : बेकायदा कामे केल्याने तोटा होईल. मूलभूत गरजा पूर्ण होतील. कार्यालयात भांडण होईल. ह्रदरोग जडण्याची शक्यता आहे. मात्र काळजी घ्या.

**कर्क** : कामात एकरूपता आणि सातत्य राहिल. कामाच्या ठिकाणचे वरिष्ठांचे दडपण जाईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**सिंह** : आपली व्यावसायिक शाखा परगावी काढाल. नैराश्य येणार नाही. मुले व पत्नीच्या सहवासामुळे आनंद मिळेल. पितृचिंता सतावेल.

**कन्या** : तांत्रिक कामे त्वरित केल्याने पुढचे नुकसान होणार नाही. राखीव फंड हाताशी ठेवाल.

**तूळ** : परस्पर वाद टाळाल. जुने मित्र-मैत्रिणी भेटतील. उत्तम वैवाहिक सौख्य लाभेल. मागील उधारी वसुल होईल. जुन्या शारीरिक व्याधीपासून मुक्तता.

**वृश्चिक** : करार वा हमीस चांगला काळ आहे. अंदाज चुकेल परंतु आशावादी असाल. दिवस आनंदात जाईल.

**धनु** : टोकाची भूमिका घेतल्यास नुकसान होईल. भावनिक चुका टाळाल. तुमचे आवडते छंद जोपासण्यासाठी चांगला वेळ मिळेल.

**मकर** : वेळ न पाळल्याने मोठे व्यावसायिक नुकसान संभवते. व्यर्थ चर्चा होईल. तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे.

**कुंभ** : भावनिक द्वंद्वे त्रासदायक ठरतील. काही ठिकाणी तुम्हाला मोठी माघार घ्यावी लागू शकेल.

**मीन** : घोळ निस्तरतील. भावनिक आनंद मिळेल. प्रवास टाळाल. आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य संतुलित राखाल. सामाजिक प्रतिष्ठा लाभेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

## छत्री

बबनराव छगनरावांना म्हणाले, 'खूप दिवस होऊन गेले. आता तरी माझी छत्री परत करा'.

छगनराव उद्गारले – 'कोणती छत्री? मी कधी आपणाकडे छत्री मागितलीच नाही. मागितली असली तरी तुम्ही ती दिली नसणार. तुम्ही दिली असली तरी मी ती घेतली नसणार. घेतली असली तर ती मी परत केली असणार. परत केली नसली तर आज परतही करणार नाही, कारण की पावसाचा रंग दिसत आहे.'


# जागतिक आश्चर्ये

## खापरे पिरॅमिड

इजिप्तच्या गिझा येथील पिरॅमिडस् पैकी खापरे येथील पिरॅमिड हा दोन नंबरचा सर्वांत मोठा उंच असा पिरॅमिड आहे. या पिरॅमिडच्या उभारणीसाठी एकूण दोन लाख तीस हजार दगडांचे ठोकळे वापरण्यात आले होते. प्रत्येक ठोकळ्यांचे वजन २ हजार ते ३० हजार किलो होते.

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# फिल्मीचक्कर क्र. ११७२ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) ++++ ++ + छोड दिया जाय बोल तेरे साथ क्या सुलूक किया जाय (गाणे) ५) 'जीवनमृत्यू, बेमिसाल, कस्मे वादे' आदी चित्रपटांची नायिका ६) जितेंद्र, लीना चंदावरकर यांचा एक चित्रपट ८) +++ समझा करो (चित्रपटाचे नाव) १०) ++++ प्यार का (चित्रपटाचे नाव) ११) बाळा गाऊ कशी मी +++? (चित्रपटाचे नाव) १३) ++ चंद्रन ('नाचे मयुरी' चित्रपटाची नायिका) १४) +++ कपूर (अभिनेत्याचे नाव)

**उभे शब्द :-** १) अलका कुबलचा गाजलेला एक मराठी चित्रपट २) एक ++ ++ +++ माटी के मोल (गाणे) ३) मुंबईचा +++ (मराठी चित्रपट) ४) अमिताभ बच्चन, नितू सिंग, अमजदखान यांचा एक गाजलेला चित्रपट ७) जितेंद्र, सुलक्षणा पंडित, रीना रॉय, संजीवकुमार यांचा एक चित्रपट ९) ++ का मीत (चित्रपटाचे नाव) ११) ++ कानून (चित्रपटाचे नाव) १२) ++ देओल (अभिनेत्री)

# ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽ मुलांचे विश्व ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : संधी आणि सुर्योदय यांच्यात एक साम्य आहे, उशिरा जागे होणाऱ्याच्या नशिबात दोन्ही नसतात.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## 'ब्रेन फॉग' म्हणजे काय?

बऱ्याच लोकांची समस्या ही आहे की ते अनेकदा लहान गोष्टी विसरतात. काही वेळापूर्वी काय घडले ते त्यांना आठवत नाही किंवा बोलत असताना अचानक ते काय बोलायचे ते समजत नाही. ही सर्व लक्षणे मेंदूच्या धुक्याशी संबंधित असू शकतात. ब्रेन फॉग ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीला स्पष्टपणे विचार करणे, गोष्टी लक्षात ठेवणे किंवा लक्ष केंद्रित करणे कठीण होते. मनात धुकं पसरल्यासारखं वाटतं. ही स्थिती अनेक कारणांमुळे उद्भवू शकते आणि एखाद्या व्यक्तीच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करू शकते. या लेखात ब्रेन फॉग टाळण्यासाठी कारणे, लक्षणे आणि मार्ग जाणून घ्या.

गोष्टी विसरणे, नावे लक्षात ठेवू शकत नाही. लक्ष केंद्रित करण्यात अडचण: एखाद्या कामावर लक्ष केंद्रित करण्यात अडचण. नेहमी थकल्यासारखे वाटणे. चिंताग्रस्त आणि उदास वाटणे. पुरेशी झोप न मिळाल्याने मेंदूला धुके येऊ शकते.

सतत तणावाखाली राहिल्याने मेंदूला धुकेही येऊ शकते. जंक फूड आणि प्रोसेस्ड फूडच्या अतिसेवनामुळे मेंदूला धुके येऊ शकते. मद्यपान आणि धूम्रपान केल्याने मेंदूच्या धुक्याची समस्या देखील वाढू शकते. काही औषधांचे दुष्परिणाम: काही औषधांचा दुष्परिणाम म्हणून मेंदूतील धुके देखील येऊ शकतात. शरीरात व्हिटॅमिन आणि मिनरल्सच्या कमतरतेमुळेही ब्रेन फॉग येऊ शकते. कॉम्प्युटर, मोबाईल आणि टीव्हीचा अतिवापर केल्याने ब्रेन फॉगही येऊ शकते या काही कारणांमुळे ब्रेन फॉग होऊ शकतो. यावर उपाय म्हणजे भरपूर फळे, भाज्या, कडधान्ये आणि काजू खा. योग, ध्यान किंवा इतर कोणत्याही क्रियाकलापाद्वारे तणाव कमी करा. दररोज व्यायाम करा. शरीर हायड्रेटेड ठेवा. कॉम्प्युटर, मोबाईल आणि टीव्हीचा वापर कमी करा. डॉक्टरांचा सल्ला घ्या: जर समस्या गंभीर असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या. ब्रेन फॉग ही एक सामान्य समस्या आहे ज्यावर उपचार केले जाऊ शकतात. निरोगी जीवनशैलीचा अवलंब करून आणि काही बदल करून तुम्ही मेंदूतील धुक्यापासून मुक्त होऊ शकता.

## बुद्धिमान राजा

अनेक वर्षांपूर्वी एका शहरात एक बुद्धिमान राजा राज्य करत होता. त्याच्या बुद्धिमत्तेची आणि हुशारीची चर्चा सर्वत्र पसरली होती. राजा कधीही विचार न करता काहीही बोलला नाही, किंवा त्याने आरोपीचे म्हणणे ऐकल्याशिवाय त्याला शिक्षा दिली नाही. त्याच्या बुद्धिमत्तेबद्दल ऐकून, आजूबाजूचे राजे, राण्या आणि राजकन्या इत्यादींना त्याचा हेवा वाटू लागला.

यामुळे, त्या राजाची बुद्धिमत्ता तपासण्यासाठी प्रत्येकजण नवीन पद्धती अवलंबत असे. व राजाची परीक्षा घेत असायचे पण प्रत्येक वेळी, राजा इतर राज्यांच्या राज्यकर्त्यांनी घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण होत असे आणि स्वतःला एक हुशार आणि सक्षम राजा असल्याचे सिद्ध करत असे.

एके दिवशी एक राजकन्या राजाची परीक्षा घेण्यासाठी आली. तसेच राजाच्या हातात राजकन्येने फुलांचे दोन हार दिले. दोन हारांपैकी एक खऱ्या फुलांनी बनलेला होता आणि दुसरा बनावट फुलांनी बनलेला होता. त्या दोन्ही हारांकडे पाहून त्यांच्यातील फरक अजिबात कळत नव्हता. आता राजकन्येने दोन्ही माळा राजासमोर ठेवल्या आणि विचारले,

'हे राजा!' जर तुम्ही बुद्धिमान असाल तर मला सांगा की यापैकी कोणता हार खरा आहे.' राजदरबारात बसलेले सर्व दरबारी हार पाहून आश्चर्यचकित झाले, कारण खरा फुलांचा हार कोणता हे कोणालाही समजू शकले नाही. खरा फुलांचा हार कोणता हे राजा कसे ओळखेल याचा सर्वांनाच प्रश्न पडला होता. हार पाहून राजाही काळजी करू लागला. त्याच क्षणी त्याच्या मनात एक कल्पना आली. त्याने ताबडतोब त्याच्या एका नोकराला सांगितले,

'बागेच्या खिडक्या उघडा.' नोकराने बागेची खिडकी उघडताच, राजाने पाहिले की फुलांवर बसलेल्या मधमाश्या खिडक्यांमधून राजदरबारात येत आहे. तो काही वेळ मधमाश्यांकडे पाहत राहिला. एकाकी मधमाशी फुलांच्या माळेवर बसताच राजा म्हणाला की आता मी सांगू शकतो की खरी माळ कोणती आहे. राजाने लगेच त्या माळेकडे बोट दाखवले ज्यावर मधमाशी बसली होती.

राजाची बुद्धिमत्ता पाहून दरबारात उपस्थित असलेले सर्वजण त्याची स्तुती करू लागले. तसेच राजाची बुद्धिमत्ता पाहून राजकन्याही आनंदी झाली.

तात्पर्य : बुद्धिमत्तेचा वापर करून आपण प्रत्येक समस्येवर उपाय शोधू शकतो.

# रहमते दर्शन (भाग – १)



घटा आसमान से साफ़ हो गई। आसमान पहले जैसा हो चुका था। अचानक महाराज जी बड़े जलाल में आये और कहने लगे, 'हुज़ूर बाबा सावनसिंह जी ने आज आपका इम्तिहान लिया और आप लोग फेल हो गये। आप लोग गुरु के मंडल को छोड़ कर चड्ढा साहब के शीश महल में जा छुपे ।

यह शीश महल हुज़ूर बाबा सावनसिंह जी के रहमो करम पर खड़ा हुआ है, नहीं तो इसकी मियाद तो २५ वर्ष पहले समाप्त हो चुकी है। आप लोगों को यही नहीं पता कि आप गुरु के मंडल में ज़्यादा सुरक्षित हो या वहाँ । फिर महाराज जी की आवाज़ ज़रा और तेज़ हो गई और उन्होंने कहा, आपने गुरु को समझ क्या रखा है ? गुरु तो महाप्रलय से भी साफ़ बचाकर ले जाता है। अगर महाप्रलय कल आती है तो बेशक आज आ जाये, गुरु जिनको नाम बख़्शता है, उनकी पूरी-पूरी संभाल करता है।

## वे विनम्रता के पुंज थे

## वे एक समाज सुधारक भी थे

परम पूजनीय संत दर्शनसिंह जी महाराज एक संत होने के साथ-साथ बहुत बड़े समाज सुधारक भी थे। उनकी समाज सुधार की प्रक्रिया से अनेकों घर सुधर चुके हैं। महाराज जी की शरण में आने के कुछ नियम हैं, जैसे माँस-मदिरा का निषेध, ये हमारे समाज सुधार की दिशा में बहुत ही सहायक है। माँस-मदिरा का सेवन प्रत्येक परिवार के लिए बहुत हानिकारक होता है। शराब ने अनेकों घर बरबाद किये हैं। हमारे परिवार का किस्सा यह है कि हमारे पिताजी मदिरा का सेवन बहुत ज़्यादा करते थे, जिससे हमारे घर की आर्थिक स्थिति ठीक नहीं रहती थी।

एक बार महाराज जी काशीपुर आये। मेरे पिताजी ने सुना कि कोई दिल्ली के संत जी आ रहे हैं। उनका दर्शन करने का कोई ख्याल नहीं था, लेकिन महाराज जी की कृपा होनी थी।

जब महाराज जी का काफिला सड़क से गुज़र रहा था, तो अचानक सड़क पर आगे कुछ अवरोध हुआ और कारें रुक गईं। मेरे पिताजी उस सड़क पर कारों को गुज़रते हुए देख रहे थे। जब गाड़ी रुकी, तो महाराज जी ने बाहर देखा।

तभी किसी ने मेरे पिताजी से कहा, देखो! वे संत दर्शनसिंह जी महाराज हैं । पिताजी के ऊपर महाराज जी की नज़र पड़ गई। वे ठगे से देखते रह गये। उन्हें काफी कुछ मिल गया था। उस एक नज़र से ही प्रभावित होकर

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

स्मरण शक्ति को बढ़ाने के लिये हमें खुश रहना चाहिए। खुश रहने से मस्तिष्क तीव्रता से काम करता है। व्यक्ति जो पढ़ता है उसे याद रहता है। मस्तिष्क की सोई हुई शक्तियां जागृत हो जाती हैं। स्नेही व्यक्तियों के मिलने से, बड़ों का आशीर्वाद मिलने से, उत्तम भोजन की प्राप्ति से, मन पसंद सुन्दर वस्त्रों की प्राप्ति से, धन की प्राप्ति से, तथा मस्तिष्क को अच्छे कार्यों में लगाने और सोचने से प्रसन्नता मिलती है। हर समय किसी न किसी के प्रति शुभ सोचते रहने से प्रसन्नता बनी रहती है। मधुर संगीत सुनने से, राजयोग का अभ्यास करने से, किसी दूसरी विधि से साधना करने से भी प्रसन्नता बनी रहती है। जो व्यक्ति मनचाही उपलब्धि चाहते हैं, कोई सिद्धि चाहते हैं उन्हें सदैव प्रसन्न रहना ही होगा।

यादाशत और चित्र

जिन चीजों पर हम अटेन्शन देते हैं वह हमें याद रहती हैं। जो चीजे चित्रों के रूप में हैं और गति में हैं, उनकी तरफ हमारा अटेन्शन ज्यादा जाता है। एक व्यक्ति अपनी पत्नी को पीट रहा है। एक लड़का

## दिमाग की शक्ती

औरत के गले से चेन खींच रहा है। एक व्यक्ति चलती ट्रेन पर भाग कर चढ़ने की कोशिश कर रहा है। एक व्यक्ति चाय पी रहा है। एक लड़की डांस कर रही है। ये सब चीजे सहज ही याद रहेंगी। ऐसे कोई भी सूचना जो याद रखना चाहते हैं उसका चलता फिरता कोई चित्र बना दें, उसे आप सहज ही याद रख सकेंगे। अगर आप यह याद रखना चाहते हैं कि राजयोग से हमें क्या प्राप्ति होती है, तो अष्ट शक्तियों का चित्र मन में देखो, आप को सभी प्राप्तियां याद रहेंगी। आप खुश रहना चाहते हैं तो मन में फूल देखते रहो। बहादुर बनना चाहते हैं तो मन में शेर को देखते रहो। आप दयालु बनना चाहते हैं तो मन में मदर तारेसा को देखते रहो। आप शांति चाहते हैं तो मन में महात्मा बुद्ध को देखते रहो। आप अहिंसक बनना चाहते हैं तो महात्मा गांधी को मन में देखते रहो। आप प्यार चाहते हैं तो मन में हंसो का जोड़ा देखते रहो। ये सब करते हुए मन में भगवान के बिंदू रूप या इष्ट को देखते रहो।

मन के गुण

मन के तीन गुण हैं सतोगुण, रजोगुण और तमोगुण । इन्हें याद रखने के लिये व्यक्ति का बचपन, जवानी और बुढ़ापे का चित्र मन में देखें। बचपन सतोगुण, जवानी राजोगुण और बुढ़ापा तमोगुण है। रजोगुण के क्या लक्षण होते हैं अगर यह याद रखना हो तो मन में एक राजा का चित्र देखें। रजोगुण अर्थात राजा के समान व्यक्ति अपने जीवन में धन दौलत, जमीन जायदाद नौकर चाकर, सोना चांदी, सुन्दर महल आदि चाहता है। तमोगुण के कौन से लक्षण होते हैं ये जानने के लिये एक शराबी का चित्र देखें। एक शराबी के सभी अवगुण तमोगुण है। तमोगुण में मनुष्य क्या करता है ये सहज ही याद रख सकते हैं। रजोगुण और तमोगुण मन को एकाग्र नहीं होने देते। सतोगुण से मन एकाग्र रहता है बहुत अच्छा महसूस होता है। शरीर ठीक होता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

७) त्याचप्रमाणे गर्भिणी रुग्णालयात दाखल झाल्यानंतर सुंठ, पिंपळी, कुष्ठ, वेलची, चित्रक, वेखंड, हिंग यांचे चूर्ण हंगावयास दिल्याने किंवा मधातून यांचे चाटण दिल्याने नैसर्गिक पध्दतीने प्रसूती होण्यास मदत होते.

८) गर्भावस्थेत सौम्य आवाजात वारंवार ऐकलेले एखादे संगीत किंवा मंत्र प्रसूतीच्या वेळेस ऐकावे. यामुळे गर्भस्थ बाळ व माता न घाबरता प्रसूती अवस्थेला सामोरे जातात व त्यामुळे नैसर्गिक प्रसूती होण्यास मदत होते.

**सिझेरियनची गरज कधी लागते :**

आडवे मूल : जर पोटातील मूल आडव्या अवस्थेत असेल, तर सिझेरियन करावे लागते. जुळी मुले : गर्भवतीला एकापेक्षा जास्त मुले उदा.२ ते ३ (जुळी) असतील तर सिझेरियनची गरज लागते.

ब्रीच प्रसूती :

बाळ डोक्याऐवजी पायाकडून म्हणजेच उलट्या अवस्थेत असल्यास सिझेरियनची गरज असते.

## प्रसूतिअवस्था

गर्भाशयाच्या मुखावर गाठ असल्यास बालकाचा जन्म योनीमुखातून होणे अशक्य असते, त्यामुळे सिझेरियन करावे लागते, याशिवाय गर्भवतीचा रक्तदाब जास्त असल्यास, नितंब अरुंद असल्यास पहिली प्रसुतीही सिझेरियन पद्धतीने झाली असल्यास त्या वेळी सिझेरियन असल्यास, तिचे नितंब नवतीचा रक्तदाब जामुळे शक्य असते, अरुंद असल्यास सिझेरियन करावे लागते. प्रसुती झाल्यानंतर स्त्रीला आयुर्वेदात 'सूतिका' असे म्हणतात.

प्रसूती झाल्यानंतर सूतिकेवर आयुर्वेदिक औषधोपचार करावेत, कारण गर्भाशयात नऊ महिने वाढणारा गर्भ बाहेर पडल्यामुळे पोकळी निर्माण होते. तसेच प्रसुती क्रियेमध्ये घेतलेल्या कळामुळे तिच्यात वातदोष निर्माण झालेला असतो. प्रसूतीनंतर सूतिकेचे सर्व स्नायूबंध, शरीर यांची झीज झालेली असते. ती झीज भरुन काढण्यासाठी तसेच वातदोषाचे शमन करण्यासाठी वातशामक सिद्ध तेलाने स्नेहन करावे. सुतिकेच्या पाठ, पोट, कंबर याला हलक्या हाताने तेल चोळावे.

गर्भाशयाचा आकार मुळ स्थितीत येण्यासाठी तसेच उदरातील दोष बाहेर पडण्यासाठी पोटावर पट्टा बांधावा; यामुळे वातदोषाचे शमन होते. त्यानंतर बाळाला सूतिकेजवळ द्यावे. कुशीत मूल घेतल्या मुळे आपण बाळाला जन्म देताना खूप कठीण अशा सत्त्वपरीक्षेतून उतरलो आहोत. व साक्षात ईश्वराची सर्वांत महान अशा उत्कृष्ट रचना असलेल्या बाळाला आपण जन्म दिला आहे.

आपल्याच अंशातून बरेचसे आपल्या सारखेच दिसणारे बाळ आपल्यासमोर आहे या भावनेने माता अतिशय आनंदित होते

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००



नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शौर्या गवळी हिची निवड झाल्याबद्दल तिचा शाळेच्यावतीने सत्कार करताना सौ. अन्सी, डीन सुमन सर व शशि कुमार आदी.

# राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शौर्या गवळी हिची निवड

नगर – अहिल्यानगर येथील पेमराज सारडा महाविद्यालय येथे नुकत्याच पार पडलेल्या शालेय विभागस्तरीय मिनि गोल्फ खेळाच्या सामन्यांमधे एकेरी प्रकारात नगर–कल्याण रोड, जाधवनगर येथील श्री चैतन्य टेक्नो स्कुलच्या इयत्ता ६ वी ची विद्यार्थीनी शौर्या शैलेश गवळी हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्षन करत १४ वर्षाखालील मुलीच्या गटात द्वितीय क्रमांक पटकावले असुन नागपूर येथे होणाऱ्या राज्य स्तरीय स्पर्धेसाठी तिची निवड करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल शाळेच्या प्राचार्या सौ.अन्सी, डीन सुमन सर तसेच क्षेत्र विस्तार अधिकारी शशि कुमार यांनी शौर्याचे कौतुक करत शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला व राज्य स्तरीय स्पर्धासाठी शुभेच्छा दिले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी सॉफ्ट बॉल व्हालीबॉल, जलतरण, थ्रोबॉल, मैदानी स्पर्धा या सर्वामधे जिल्हास्तरावर बाजी मारल्याचे प्राचार्यानी सांगीतले. मिनि गोल्फ खेळाच्या जिल्हा स्तरीय स्पर्धेमध्ये शाळेच्या शौर्या गवळी व अराध्या ठाणगे यांनी अनुक्रमे प्रथम व व्दितिय क्रमांक पटकावला होता.

विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा प्रमुख सुनिल मोहिते, क्रीडा शिक्षक आदित्य क्षिरसागर व कोमल कुंद्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले

# आनंदऋषीजी हॉस्पिटल म्हणजे 'एक छत्र अनेक उपचार'

## संपतलाल मुथियान यांचे प्रतिपादन



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये कान, नाक, घसा मोफत तपासणी शिबीराला प्रतिसाद मिळाला.

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आल्यावर इथले वातावरण, पावित्र्य पाहिल्यावर रूग्णाचा निम्मा आजार बरा होतो. आपण नक्की बरे होवू असा विश्वास त्याच्या मनात तयार होतो. मी स्वत: रूग्ण म्हणून येथील आपुलकीच्या प्रेमाच्या आरोग्य सेवेचा लाभ घेवून अतिशय जलदगतीने ठणठणीत बरा होवून घरी परतलो होतो. जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य तनमनधनाने या सेवाकार्यात योगदान देतात. प्रत्येक बारीकसारीक गोष्टींवर त्यांचे लक्ष असते. त्यामुळे प्रत्येक रूग्णाला दर्जेदार आरोग्यसेवा मिळते. येथील तज्ज्ञ डॉक्टर तसेच स्टाफही कायम विनम्र भावनेने रूग्णाला विश्वासात घेवून सेवा देतो. पूर्वी एखाद्या कापड दुकानाची जाहिरात करताना एक छत्र अनेक वस्त्र अशी केली जायची. आनंदऋषीजी हॉस्पिटल म्हणजे एक छत्र अनेक उपचार असे आहे, असे प्रतिपादन उद्योजक संपतलाल मुथियान यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे गुरुवारी कान, नाक, घसा मोफत तपासणी शिबिराचे उद्घाटन संपतलाल मुथियान यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाले. यावेळी अतुल मुथियान, राहुल मुथियान, उद्योजक कुणाल मुथियान, जयश्री मुथियान, नयन मुथियान, कायरा मुथियान, जैन सोशल फेडरेशनचे डॉ.वसंत कटारिया, सतीष लोढा, डॉ.प्रकाश कांकरिया, वसंत चोपडा, डॉ.आशिष भंडारी, तज्ज्ञ डॉ. सुकेशिनी गाडेकर, डॉ.अतुल तुपे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ.वसंत कटारिया यांनी सांगितले की, आचार्यश्रींच्या मानवसेवेच्या शिकवणीनुसार जैन सोशल फेडरेशन हॉस्पिटलमध्ये सर्वोच्च दर्जाची आरोग्य सेवा प्रदान करीत आहे. हृदयरोग विभागासह येथील सर्व आजारांवरील विभाग अत्याधुनिक मशीनरीनी सुसज्ज आहेत. अतिशय माफक दरात किंवा गरजूंना मोफतही चांगली उपचार सेवा देण्यावर भर असतो. या कार्यात संपतलाल मुथियान परिवाराने नेहमीच योगदान दिले आहे. भगवान महावीर युनिर्व्हसिटीच्या उभारणीतही त्यांनी मोठा सहयोग दिलेला आहे. अशा दानशूरांमुळेच हॉस्पिटलला सेवाकार्याचा विस्तार करता येतो व जास्तीत जास्त रूग्णांना सेवा देता येते.

डॉ.अतुल तुपे म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटल–मधील कान, नाक, घसा उपचार विभाग अद्ययावत सुविधांनी सुसज्ज आहे. घशाच्या एण्डोस्कोपीची सुविधा उपलब्ध आहे. ऑपरेशन थिएटरमध्ये जागतिक दर्जाचा मायक्रोस्कोप उपलब्ध आहे. ॲलर्जी, घोरणे, चक्कर येणे, श्वास घेण्याची समस्या, बोलण्यात समस्या व इतर आजारांवर शिबिरात तपासणी होणार आहे. याशिवाय शस्त्रक्रिया ५० टक्के सवलतीच्या दरात करण्यात येणार आहेत. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. सतीष लोढा यांनी आभार मानले. या शिबिरात ११० रूग्णांची तपासणी करण्यात आली.

# भगवंताचे नामस्मरण करुन सेवा केल्यास जीवन सुखकर होऊ शकते

## ह.भ.प. उद्धव महाराज चोले यांचे प्रतिपादन; सारसनगर येथे श्री संत भगवान बाबा व वामनभाऊ पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त हरिनाम सप्ताहास प्रारंभ



संत भगवानबाबा व वामनभाऊ पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त सारसनगर येथील संत भगवानबाबा मंदिर येथे सप्ताहमध्ये दुसरे पुष्प गुंफताना ह.भ.प. उद्धव महाराज चोले व श्री संत भगवानबाबा सेवाभावी प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते.

नगर – कितीही भौतिक सुविधा उपलब्ध असल्या तरी आज प्रत्येक मनुष्याला सुख आणि शांतीची गरज आहे. त्यावर अध्यात्म हा जालिम उपाय आहे. भगवंतांच्या नामस्मरणातून मनुष्यातील दु:ख नाहिसे होतात. त्यामुळे मनुष्याने भगवंताचे नामस्मरण करुन सेवा केल्यास आपले जीवन सुखकर होऊ शकते. आज मोबाईलच्या मायाजाळात अडकून पडलेली भावी पिढी सुसंस्कारीत करण्याची जबाबदारी आपणावर आहे. श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान ट्रस्ट व भक्त मंडळ पंचक्रोशी यांच्यावतीने किर्तन सप्ताहाचे आयोजन करुन भाविकांना भक्ती मार्ग दाखविला आहे.आपल्या संत–महंतांनी सांगितलेले अध्यात्मातून समाजसेवेचे व्रत जोपासले जात आहे. ही आज समाजाची गरज झाली आहे, असे प्रतिपादन सप्ताहाचे दुसरे पुष्प गुंफताना ह.भ.प. उद्धव महाराज चोले यांनी केले.

संत भगवानबाबा व वामनभाऊ पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त सारसनगर येथील संत भगवानबाबा मंदिर येथे सप्ताहास प्रारंभ झाला. या सप्ताहाअंतर्गत १४ ते २२ जानेवारी दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुभारंभप्रसंगी १४ जानेवारी रोजी महंत स्वामी अमृतानंद सरस्वती यांचे हरि किर्तन झाले. तसेच १५ जानेवारी रोजी हभप उद्धव महाराज चोले, १६ जानेवारी रोजी हभप रामगिरी महाराज १७ जानेवारी रोजी ह.भ.प. मोनलताई वाघ, १८ जानेवारी रोजी ह.भ.प. काशिनाथ महाराज, १९ जानेवारी रोजी अमोल महाराज जाधव, २० जानेवारी रोजी ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री व २१ जानेवारी रोजी हभप योगेश महाराज आव्हाड यांचे तर २२ जानेवारी रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. भिमराज महाराज दराडे (आळंदी देवाची) यांचे काल्याचे किर्तन आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत होईल. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होईल.

सप्ताहांतर्गत दररोज पहाटे काकडा, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, सायंकाळी हरिपाठ व रात्री किर्तन असे दैनंदिर कार्यक्रम होणार आहेत.

सप्ताहाचे आयोजन श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान ट्रस्ट व भक्त मंडळ पंचक्रोशी यांच्यावतीने करण्यात आले आहे. या सप्ताहाचा लाभ घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. वरील सर्व कार्यक्रम सारसनगर येथील संत भगवान बाबानगर या ठिकाणी होणार आहेत.

# सिध्दीबाग येथील सिध्देश्वर मंदिरात सामुदायिक पादुका पूजन उत्साहात

## श्रीस्वामी समर्थाच्या मूळ गुरूपीठावरील पादुकांचे शहरात भक्तीपूर्ण वातावरणात घरोघरी पूजन



नगर – अक्कलकोट येथील श्रीस्वामी समर्थाच्या मूळ गुरूपीठावरील परमसद् गुरू गजाजन महाराजांच्या चैतन्य पादुकांचे आगमन १२ जानेवारीला अहिल्यानगरमध्ये मोठ्या थाटात झाले. शहर आणि उपनगरातील घरोघरी भक्तिपूर्ण वातावरणात पादुका पूजन सुरू आहे, अशी माहिती श्रीमती शोभनाताई वाळिंबे यांनी दिली.

भाविक आपल्या घरी पादुका येणार म्हणून पादुकांच्या स्वागताची जय्यत तयारी अत्यंत श्रध्देने करत आहेत. सावेडीमधील अमित बॅक कॉलनीमध्ये योगेश अनासपुरे यांच्या निवासस्थानी पादुकांचे पूजन होऊन घरोघरी पादुका पूजनाचा सोहळा सुरू झाला. १७ जानेवारीपर्यंत या पादुकांचे पूजन शहरातील विविध भागातील भाविकांच्या निवासस्थानी सुरू रहाणार आहे. ज्या भाविकांना आपल्या निवासस्थानी पादुकांचे पूजन करण्याची इच्छा असेल त्यांनी अमित वाळिंबे यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक ८८८८१५५०५५ वर संपर्क साधावा, असे आवाहन ल. य. कुवळेकर, सौ. ज्योती वाळिंबे आणि मिलिंद चवंडके यांनी केले आहे.

१५ जानेवारीला सायंकाळी ५.३० ते ६.३० या वेळेत सिध्दी बागेतील महादेव मंदिराच्या प्रांगणात पादुका पूजनाचा सामुदायिक सोहळा भक्तिपूर्ण वातावरणात झाला. शहरासह उपनगरातील तसेच केडगाव आणि भिंगार येथील स्त्री–पुरूष भाविक या सामुदायिक पादुका पूजन सोहळ्यास उपस्थित होते. उपस्थित सर्व भाविकांनी पादुका पूजनासह दर्शनाचा लाभ घेतला. यावेळी आजच्या काळात घरोघरी सूर्योदय आणि सूर्यास्ताचे वेळी अग्निहोत्र करणे किती आवश्यक आहे, हे शास्त्राआधारे सप्रात्यक्षिक समजावून सांगण्यात आले.

# पुष्पा, विना....




सन १९८७ मध्ये माझे सासरे कै. बाळासाहेब काळे , यांचेकडे कै. लका कुलकर्णी, आप्पासाहेब शिंदे हे आले आणि म्हणाले की नगर जिल्हा सहकार क्षेत्रात खूपच आघाडीवर आहे परंतु इथे स्वतंत्र महिला बँक नाही. त्या संदर्भात आपण आपल्या सुनबाई मेधा काळे यांना मुख्य प्रवर्तक म्हणून काम करण्यास सांगून बँक स्थापनेत

पुढाकार घेण्यास सांगावे, माझ्यापुढे तो प्रस्ताव आल्यावर मी जरा विचारात पडले की आपण पुस्तके लिहिली शिक्षण क्षेत्रात काम करीत आहोत पण सहकार बँकिंग क्षेत्र हे पूर्णपणे अपरिचित असे क्षेत्र आहे. शेवटी खूप विचार करून हे काम करण्यास मी मान्यता दिली आणि मग बँक स्थापनेसाठी सहकारी भगिनींची निवड केली त्यात प्रा. पुष्पाताई मरकड यांचे नाव अग्रेसर होते. जिल्हा मराठा संस्थेच्या डीएड कॉलेजला त्या प्राध्यापिका होत्या त्या एम एड झालेल्या आणि मी जिल्हा मराठा च्या न्यू आर्ट्स अँड सायन्स कॉलेजमध्ये मराठीची प्राध्यापिका होते. बँकेच्या स्थापनेसाठी मग सहकारी भगिनींच्या बैठका होत असत आणि बँक स्थापनेसाठी काय करावे लागते त्यासाठी कोणती कागदपत्रे लागतात याविषयी चर्चा केल्या गेल्या त्यानुसार डी डी आर ऑफिस मध्ये त्या कागदपत्रांच्या पूर्ततेच्या तयारीला लागलो त्यावेळी एक सर्वे रिपोर्ट ऑफिस मधून आम्हाला दिला गेला आणि तो भरून आणण्यास सांगितले त्यावरून असे कळणार होते की नगरमध्ये स्वतंत्र महिला बँकेची आवश्यकता आहे की नाही त्या रिपोर्ट मधील माहिती भरण्यासाठी पुष्पाताईंची खूपच मदत झाली त्यामध्ये नगरची लोकसंख्या त्यात महिलांची संख्या त्यातही नोकरी करणाऱ्या महिलांची संख्या व्यवसाय करणाऱ्या महिलांची संख्या गृहिणी असलेल्या महिलांची संख्या ही माहिती होती ती सर्व भरून तो रिपोर्ट प्रथम डी डी आर कार्यालयात तिला तिथून तो नाशिकला व नाशिक वरून पुन्हा पुणे येथून मुंबईला रिझर्व बँकेत गेला एक आदर्श रिपोर्ट म्हणून त्याचे खूपच कौतुक झाले त्यानंतर रिझर्व बँकेने ९ डिसेंबर १९८७ रोजी महिला बँकेचा परवाना दिला त्यासाठी अट होती की तीन लाख रुपयांचे शेअर भांडवल गोळा करणे

त्यासाठी पुष्पाताई मरकड आणि इतर मैत्रिणींनी खूप मदत केली बँकेच्या स्थापना साठी लागणाऱ्या सर्व प्रक्रियांमध्ये सुद्धा पुष्पाताईंचा मोलाचा वाटा होता ४ जानेवारी १९८८ ला बँक सुरू झाली तेव्हापासून ते

आत्तापर्यंत बँकेच्या कार्यात यशात पुष्पाताईंचे मोठे योगदान आहे कर्ज ठेवी या सर्व बाबत प्रगती करत आज बँकेने पाच शाखा उभ्या केल्या आहे बँकेला अनेक राज्यस्तरीय पुरस्कारही मिळाले प्रत्येक पुरस्कारा कार्यक्रमाला पुष्पाताई हजर असत

बँकेचे कामकाज करत असताना काही अडचणी आल्या यामधून मार्ग काढण्यासाठी पुष्पाताई यांनी खंबीरपणे साथ दिली. त्यातील एक प्रसंग आठवतो बँकेने माळीवाडा पंचपीर चावडी येथे इमारत खरेदी केली नवीन इमारतीमध्ये स्थलांतर करण्याचे काम सर्व संचालकांनी केले त्यात पुष्पाताईंचा खूपच मोलाचा वाटा आहे. आतापर्यंत बँकेस अनेक उत्कृष्ट बँकेचे पुरस्कर मिळालेले आहेत. बँकेच्या नावलौकिक व यशामागे पुष्पाताई यांचा सिंहाचा वाटा आहे. नवीन सीईओ नेमताना सुद्धा पुष्पाताईंनी खूपच सहकार्य केले

पुष्पाताई यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य सुद्धा अतिशय उल्लेखनीय आहे आजही त्यांचे अनेक विद्यार्थी येऊन त्यांना म्हणत असत की मॅडम तुम्ही आम्हाला घडवले आणि जीवन जगताना शिक्षणाचा कसा उपयोग करावा हेही शिकवले. त्यांना अहमदनगर जिल्हा परिषदे कडून दिल्या जाणाऱ्या आदर्श शिक्षिका या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

त्यांचे कौटुंबिक जीवनही अतिशय समृद्ध असे आहे पती कै. मोहनराव मरकड हे अत्यंत कर्तबगार असे मुख्याध्यापक होते त्यांची मुले किशोर आणि नितीन हेही आपापल्या क्षेत्रात कर्तबगारी गाजवत आहेत मुलगा किशोर हा पत्रकार असून प्रवास क्षेत्रात साहित्य क्षेत्रात मराठा पतसंस्थेच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात मोठे कर्तुत्व गाजवत आहे नितीन सुद्धा त्याच्या व्यवसाय उत्तम रीतीने करत आहे आणि सामाजिक क्षेत्रात काम करत आहे दोन सुना असून एक सून शुभांगी ही प्राथमिक शिक्षक बँकेत कार्यरत असून दुसरी वैशाली ही जिल्हा मराठा संस्थेच्या शाळेत शेंडी येथे कार्यरत आहे ना तू ओंकार आदित्य शिवतेज व नात शिवानी ही अत्यंत गुणी आणि सुसंस्कारित मुले आहेत.

गेली ३७ वर्ष आम्ही अतिशय जिवलग मैत्रिणी होतो पुष्पाताई घरच्या बाबतीत आणि बँकेच्या संदर्भात अतिशय अचूक आणि योग्य निर्णय देत असत त्या स्वभावाने अतिशय प्रेमळ प्रसंगी कडक सुद्धा होत्या आपल्या निर्णयावर ठाम असत बँकेच्या कर्मचाऱ्यांमध्ये ही त्यांच्याविषयी आदर युक्त भीती होती बँकेला अंबिकेचे नाव देण्याबाबत ही त्याच खूप आग्रही होत्या बँकेला कर्ज ठेवी सभासद मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे बँकेच्या वसुलीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे म्हणूनच बँक आजवर शून्य टक्के एनपीए राखू शकली

पुष्पाताईंचे लवकर लग्न झाले त्या दहावी पूर्ण झाल्यानंतर लग्न केले त्यांना पुढे शिकण्याची खूप इच्छा होती त्या नेवासा तालुक्यातील सोनई या गावच्या त्यांचं माहेरचं कुटुंब १०० माणसांचं त्या काळात दहावीपर्यंत शिक्षण खूप झाले असे समजले जायचे मात्र त्या शालेय जीवनापासून हुशार असल्याने मला पुढे खूप शिकायचे ही त्यांची जिद्द होती लग्न ठरलं तेव्हा त्यांचे आजोबा रामराव पाटील दरंदले यांनी सरांना विचारले की तुम्ही मुलीला पुढे शिकवणारा असाल तर मी लग्नास होकार देईल तेव्हा सरांनी मी त्यांना शिकवणार असे सांगितले आणि खरंच त्यांनी नगरला आणून त्यांचे शिक्षण पूर्ण केले. एकीकडे संसार सर नोकरी निमित्ताने बाहेर तालुक्यात वर्षानंतर पाठीशी एक मुल आणि अशी सगळी सर्कस करून त्यांनी बीए पदवी घेतली पुढे बीएड झाल्या पुढे एम ए त्यानंतर एम एड त्यावेळी त्या गावातून एवढ्या पदव्या घेणाऱ्या त्या पहिला महिला ठरल्या. पदवी घेतल्यानंतर लगेच त्यांना शिक्षण विभागातून बीएलओची ऑर्डर आली तेव्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे जेष्ठ विश्वस्त रावसाहेब मस्के यांच्याकडे सर घेऊन गेले ते म्हणाले की ती नोकरी करण्यापेक्षा तुम्ही आपल्या संस्थेमध्ये शिक्षक त्यांनी अध्यापनाची जोड पकडली आणि रुजू काही वर्ष बाहेर पुढे नगर येथील डीएड कॉलेजला त्या प्राध्यापक म्हणून सेवानिवृत्तीपर्यंत त्या काळात अनेक शिक्षक त्यांनी घडवले.

माहेरी त्यांना सातत्याने मान होता आम्ही निवडून आल्यानंतर किंवा निवड झाल्यानंतर पहिला सत्कार त्यांचा माहेरचा होत असेल प्रत्येकाला माहेरची साडी दिली जायची त्यांच्याविषयी त्यांच्या प्रत्येक चुलत्यांना व भावांना आदर होता त्यांच्या शब्दाला मान होता त्यांनी पण सासर आणि माहेर कुटुंब जोडले अनेक माणसे आपल्या जीवनामध्ये जोडली कोणाचा वाढदिवस असेल कोणाची निवड झाली की आठवणीने त्याला फोन करणे तसेच प्रत्येकाचा सुखदु:खात सहभागी होणे हा दिनक्रम त्यांचा शेवटपर्यंत चालू होता. त्या कधी थकलेल्या मी पाहिल्या नाही.

अशी जिवलग मैत्रीण मला परमेश्वराच्या कृपेने मिळाली मला बहीण नाही पण पुष्पाताईंच्या रूपाने मला प्रेमळ बहिण मिळाली त्याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानते

**– प्रा. मेधा काळे, संस्थापिका**
**दि अंबिका महिला सहकारी बँक लिमिटेड अहमदनगर.**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस आमचे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरुन व विनंतीनुसार या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक कौस्तुभ जयंत रसाळ, रा. १०७, अष्टभुजा आर्किड, शनिचौक, गायत्री मंदिराजवळ, घुमरे गल्ली, अहमदनगर यांनी सदरहू मिळकत आमच्या आशिलास कायम खुषखरेदी देण्याचे ठरविले आहे. व त्याप्रमाणे त्यांनी आमचे आशिलास सदरहू मिळकत पुर्णपणे त्यांना विकण्याचा अधिकार असून ती पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याबद्दल आमच्या आशिलास त्याची विश्वास व हमी दिली आहे. या उपरोक्त सदरहू मिळकतीवर कोणाचेही कुठल्याही प्रकारे काही एक साठेखत, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस जामिन, अन्नवस्त्र पोटगी, लिज, अदलाबदल, जनरल मुखत्यार, कौटुंबिक अदलाबदल, वाटप, वाटपाबद्दल वाद वगैरे किंवा कुठल्याही बँक सोसायटी, कोर्ट यांचा दावा अगर बोजा नोटी, क्लेम, मनाई, जप्ती वगैरे, हक्क अधिकार हितसंबंध असल्यास त्यांनीही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत आम्हाला वरिल पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी कळवावे, अन्यथा सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध निजोखमी असल्याचे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग कोणाचेही कुठल्याही प्रकारे काहीएक तक्रार, हरकत विचारात घेतली जाणार नाही. आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही. म्हणून मुद्दाम ही नोटीस दिली असे.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :-**

मौजे शहर अ. नगर ता. जि. पो. तु. म. ना. पा. अहिल्यानगर हद्दीतील सि. स.नं. ५३४५+५३३०+५३६४+५३४९ए या मिळकतीचा नविन सि. स. नं. ५३४५ मधील अष्टभुजा आर्किड मधील फ्लॅट नं. ए१०७ चे क्षेत्र ४३.६० चौ.मी.

**यांसी चतु:सिमा :-**

पूर्वेस : फ्लॅट नं. ए१०८
दक्षिणेस : फ्लॅट नं. ए१०६
पश्चिमेस : ओपन टू स्काय
उत्तरेस : ओपन टू स्काय

येणे प्रमाणे चतु:सिमापूर्वक तदंगभुत वस्तुसह जाणे येणे हक्क मालकी कब्जा, वागवहिवाटीसह भविष्यातील सर्व लाभ अधिकारासह असलेली मिळकत.

नोटीस दिली असे.
दिनांक : १६/०१/२०२५

**ॲड विजय बी. मुनोत**
बारातोटी कारंजा, माळीवाडा, अहमदनगर ४१४००१.
फोन (०२४१) २३४६८९७, मो. ९८५०८७३१५३

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस आमचे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरुन व विनंतीनुसार या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक **अरुण विष्णु रसाळ,** रा. १०६, अष्टभुजा आर्किड, शनिचौक, गायत्री मंदिराजवळ, घुमरे गल्ली, अ.नगर **यांचे ज. मु. निखिल अनिल कोल्हटकर** दस्त नं. टनन– १/३७११/२४ यांनी सदरहू मिळकत आमच्या आशिलास कायम खुषखरेदी देण्याचे ठरविले आहे. व त्याप्रमाणे त्यांनी आमचे आशिलास सदरहू मिळकत पुर्णपणे त्यांना विकण्याचा अधिकार असून ती पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याबद्दल आमच्या आशिलास त्याची विश्वास व हमी दिली आहे. या उपरोक्त सदरहू मिळकतीवर कोणाचेही कुठल्याही प्रकारे काही एक साठेखत, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस जामिन, अन्नवस्त्र पोटगी, लिज, अदलाबदल, जनरल मुखत्यार, कौटुंबिक अदलाबदल, वाटप, वाटपाबद्दल वाद वगैरे किंवा कुठल्याही बँक सोसायटी, कोर्ट यांचा दावा अगर बोजा नोटी, क्लेम, मनाई, जप्ती वगैरे, हक्क अधिकार हितसंबंध असल्यास त्यांनीही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत आम्हाला वरिल पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी कळवावे, अन्यथा सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध निजोखमी असल्याचे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग कोणाचेही कुठल्याही प्रकारे काहीएक तक्रार, हरकत विचारात घेतली जाणार नाही. आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही. म्हणून मुद्दाम ही नोटीस दिली असे.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :-**

मौजे शहर अ. नगर ता. जि.पो. तु. म. ना. पा. अहिल्यानगर हद्दीतील सि. स.नं. ५३४५+५३३०+५३६४+५३४९ए या मिळकतीचा नविन सि. स. नं. ५३४५ मधील अष्टभुजा आर्किड मधील फ्लॅट नं. ए १०६ चे क्षेत्र ४३.६० चौ.मी.

**यांसी चतु:सिमा :-**

पूर्वेस : फ्लॅट नं. ए१०५
दक्षिणेस : ओपन टू स्काय
पश्चिमेस : ओपन टू स्काय
उत्तरेस : फ्लॅट नं. ए१०७

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक तदंगभुत वस्तुसह जाणे येणे हक्क मालकी कब्जा, वागवहिवाटीसह भविष्यातील सर्व लाभ अधिकारासह असलेली मिळकत.

नोटीस दिली असे.
दिनांक : १६/०१/२०२५

**ॲड विजय बी. मुनोत**
बारातोटी कारंजा, माळीवाडा, अहमदनगर ४१४००१.
फोन (०२४१) २३४६८९७, मो. ९८५०८७३१५३


# राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्याचे नागरिकांना आवाहन

नगर – प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, इतर राष्ट्रीय कार्यक्रम तसेच विशेष प्रसंगी राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

विविध प्रसंगी राष्ट्रध्वजाचा वैयक्तिकरित्या वापर केला जातो. अशा कार्यक्रमानंतर राष्ट्रध्वज इतस्ततः पडलेले दिसून येतात. अशा प्रकारे राष्ट्रध्वजाची अवहेलना होणार नाही, याची सर्वांनी दक्षता घ्यावी. ध्वजसंहितेतील सर्व नियमांचे व सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. कागदी राष्ट्रध्वजाचा वापर ध्वजसंहितेच्या तरतूदीमध्ये नमूद केल्यानुसारच करावा. तसेच ख़राब झालेले माती लागलेले राष्ट्रध्वज गोणी किंवा कपड्यामध्ये व्यवस्थित बांधुन शिऊन बंद करावेत. अशासकीय संस्था, इतर संघटनांनी तसेच नागरिकांनी राष्ट्रध्वज तहसिल कार्यालयात सुपूर्द करावेत. राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखावा, असेही कळविण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत अभिलाषा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित अहमदनगर यांचे **संजय भिमराज लाहोर, रा. फ्लॅट नं. २१२, गुरुनानक अपार्टमेंट, गोविंदपुरा, अहमदनगर** यांना संस्थेने वाटप केली असुन सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, दि महाराष्ट्र स्टेट को. ऑप. हौसींग फायन्सास कॉ. लि. चे कर्ज व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ (सात) **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा अहमदनगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे भिंगार** येथील **मुकुंदनगर भागातील अलमास पार्क सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,** मधील रो– हौसिंग ब्लॉक मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | चौ. मीटर |
|---|---|---|
| ३४३ / १अ / २ब२ | ३५ | २६८.९७ |

यावर लोडबेअरींगमध्ये बांधकाम केलेल्या अलमास पार्क सहकारी गृहनिर्माण संस्था मधील रो–हाऊस ब्लॉक नं. ४० याचे प्लॉट क्षेत्र ४५.७१ चौ. मीटर व त्यावरील बांधकाम क्षेत्र २६.३६ चौ. मीटर असून बाकी मागे पुढे खुली जागा असुन यातील इले. लाईट मीटर व नळ कनेक्शनसह आहे त्या स्थितीत रोहाऊस ब्लॉक मिळकत.

**यासी चतु:सिमा-**
पुर्वेस – प्लॉट नं. ३६, दक्षिणेस – रो–हाऊस ब्लॉक नं. ४१,
पश्चिमेस – रस्ता, उत्तरेस – रो हाऊस ब्लॉक नं. ३९
दि. १६/०१/२०२५, अहमदनगर.

**ॲड. तनवीर एम. शेख**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
गोविंदपुरा, अहमदनगर
मो.नं. ९२७०४६४६००

**ॲड. मोहसीन आय. शेख**
**ॲड. गुफरान एफ. मोमीन**
कस्तुरी प्लाझा, डावरे गल्ली, अहमदनगर
मो.नं. ८०८७७४२४२८


# श्री संत जळोजी–मळोजी महाराज पुण्यस्मरणनिमित्त १८ जानेवारी रोजी कार्यक्रम

नगर – सालाबादप्रमाणे याही वर्षी अहिल्यानगर जिल्हा विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज ट्रस्ट अहिल्यानगर यांचे वतीने १८ जानेवारी रोजी संस्थेच्या नवीन टिळक रोड, अहिल्यानगर येथील कार्यालयात सकाळी ११ वा श्री संत जळोजी–मळोजी महाराज पुण्यस्मरण कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष, मुरलीधर वाघमारे तसेच सर्व विश्वस्त मंडळ यांचेवतीने साजरी करण्यात येणार आहे

कार्यक्रमातंर्गत सकाळी ९ ते ११ वाजता श्री संत जळोजी–मळोजी यांचे पोथी वाचन होईल. तसेच सकाळी ११ वा. दिप प्रज्वलन व संताच्या प्रतिमेचे पुजन संस्थेचे सर्व विश्वस्त मंडळ यांचे हस्ते हार घालून महाआरती करण्यात येईल. कार्यक्रमानंतर चहा पाणी व अल्पोपहाराचा कार्यक्रम ठेवण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमास सभासद समाज बांधव तसेच सुतार समाजातील बंधू– भगिनींनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष मुरलीधर वाघमारे, सचिव राधाकृष्ण वाकचौरे, विश्वस्त सतिश क्षीरसागर, श्रीराज भागवत, दिलीप गडकर, रावसाहेब वाघमारे, प्रभाकर वाघमारे, श्री. राजेंद्र क्षीरसागर यांनी केले आहे.



एमआयडीसीच्या जिमखाना मैदानावर टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेला आयुक्त यशवंत डांगे व एल अ‍ॅण्ड टी कंपनीचे व्यवस्थापक अरविंद पारगावकर यांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला.

# मुलांमध्ये खेळाडूवृत्ती मैदानी खेळातून विकसीत होते

## आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; एमआयडीसीच्या जिमखाना मैदानावर टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ

नगर – खेळातून युवकांमध्ये एक संघाची भावना निर्माण होते. मोबाईलच्या आहारी गेलेल्या युवकांना मैदानी खेळातून बाहेर पडता येणार आहे. खेळातून मन व शरीर सदृढ बनते. पराभवाने खचून न जाता पुन्हा जिद्दीने पुढे जाण्याचे व विजयाने हुरळून न जाता पुढे वाटचाल करण्याचे खेळाडूवृत्ती मैदानी खेळातून विकसीत होत असते. यासाठी पालकांनी मुलांना मैदानाकडे घेऊन येण्याची गरज असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

नगर एमआयडीसीच्या जिमखाना मैदानावर पाच दिवसीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. अंबिका उद्योग समूह संचलित अंबिका क्रिकेट क्लबच्या वतीने या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. एल अ‍ॅण्ड टी कंपनीचे व्यवस्थापक अरविंद पारगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक माणिक चौधरी उपस्थित होते.

प्रथम विजेत्या संघास १ लाख, उपविजेत्या संघास ७१ हजार, तृतीय विजेत्या संघास ५१ हजार व चौथ्या संघास ३१ हजारांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक व खेळाडूस प्रत्येकी ५ हजार रुपयांचे बक्षिस दिले जाणार आहे.

या स्पर्धेचा अंतिम सामना १९ जानेवारी रोजी रंगणार आहे. सामन्यातील खेळाडूंना अंबिका ग्रुपच्या वतीने वैयक्तिक बक्षिसे दिली जाणार आहेत. स्पर्धेत प्रवेश केलेल्या संघातील खेळाडूंना केशव नागरगोजे व बाळासाहेब बडे यांच्याकडून टी–शर्ट देण्यात आले आहे.

## ग्रामीण भारत : भविष्यातील गुंतवणुकीची महत्त्वाची संधी

ग्रामीण भारत झपाट्याने विकसित होत आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेकडून गतिमान, अनेक क्षेत्रे असलेल्या विकासाच्या इंजिनमध्ये त्याचे रूपांतर होत आहे. गेल्या काही दशकांत उत्पादन, बांधकाम आणि व्यापार ही क्षेत्रे महत्त्वाची भूमिका बजावू लागली आहेत. त्यामुळे शेतीवरील मोठ्या प्रमाणात असलेले अवलंबित्व कमी झाले आहे. पायाभूत सुविधांमधील लक्षणीय सुधारणांसोबतच या वैविध्यांमुळे ग्रामीण भारताला गुंतवणुकीचे उदयोन्मुख हॉटस्पॉट म्हणून स्थान मिळाले आहे.



अविनाश पोपटराव साबरे

जवळपास ९९ टक्के ग्रामीण गावे आता रस्ते, वीज आणि पुलांनी जोडली गेली आहेत, तर मोबाईलचा प्रसार आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीने नवीन उंची गाठली आहे. यामुळे ग्रामीण भारत शहरी बाजारपेठेच्या आणखी जवळ आला असून व्यवसायांना पूर्वी लाभदायक नसलेल्या बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यासाठी दारे खुली झाली आहेत. एफएमसीजीपासून ई–कॉमर्सपर्यंत विविध क्षेत्रांतील कंपन्या या ट्रेंडचा लाभ घेत असून ग्रामीण भागातील वाढती क्रयशक्ती आणि बदलत्या उपभोग पद्धतीचा त्यांना फायदा होत आहे.

साक्षरतेचा वाढता दर आणि शिक्षण आणि आरोग्यसेवेच्या चांगल्या उपलब्धते–मुळे ग्रामीण भारताचा केवळ आकारच नाही, तर आर्थिक क्षमताही वाढत आहे. दरडोई उत्पन्न २,००० डॉलरच्या पुढे गेले असून त्यामुळे खर्च करण्यायोग्य उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे आणि ग्रामीण उपभोग वाढला आहे. परिणामी ग्रामीण भागातील स्वेच्छेने करायच्या खर्चात अन्नाचा वाटा कमी होत असून, अत्यावश्यक नसलेल्या वस्तू व सेवांवरील खर्चाकडे ओढा वाढल्याचे संकेत मिळत आहेत.

हे बदलते आर्थिक चित्र आणि उत्पन्नाच्या पातळीत सातत्याने होणारी वाढ यात दशकभरापूर्वी शहरी उपभोग वाढल्यावर शहरी भारतात दिसलेल्या वाटचालीचे प्रतिबिंब दिसून येते. आता, भारताची दोन तृतीयांश लोकसंख्या ग्रामीण भागात राहत आहे, तरीही जीडीपीमध्ये (सकल देशांतर्गत उत्पादन) त्यांचा वाटा सुमारे ४६ टक्के एवढा आहे. म्हणून ग्रामीण अर्थव्यवस्थेत गुंतवणुकीची एक जबरदस्त संधी आहे.

गुंतवणुकदारांच्या दृष्टीने ग्रामीण संकल्पना ही भारताच्या सर्वांगीण विकासाच्या लाटेवर स्वार होण्यासाठीचा एक आश्वासक मार्ग उपलब्ध करून देते. ग्रामीण विकास आणि उपभोगाच्या वाढीवर भर देणाऱ्या म्युच्युअल फंड योजना एक अनोखी संधी देतात. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होऊन उत्पन्नात वाढ होत असताना, ग्रामीण भारत हा भारताच्या आर्थिक भवितव्याचा एक महत्त्वाचा चालक ठरणार आहे. त्यामुळे कोणत्याही गुंतवणुकीच्या पोर्टफोलिओमध्ये ही एक आकर्षक भर ठरणार आहे.

श्रद्धा इन्व्हेस्टमेंट्सचे अविनाश पोपटराव साबरे म्हणाले की याच अनुषंगाने गुंतवणूकदार आयसीआयसीआय प्रुडेन्शियल म्युच्युअल फंडाची नवीन फंड ऑफर असलेल्या आयसीआयसीआय प्रुडेन्शियल रूरल अपॉर्च्युनिटीज फंडमध्ये गुंतवणूक करण्याचा विचार करू शकतात. या फंडाची न्यू फंड ऑफर (एनएफओ) २३ जानेवारी २०२५ पर्यंत खुली आहे. ही ओपन–एंडेड इक्विटी योजना प्रामुख्याने ग्रामीण भारताच्या विकास आणि प्रगतीला चालना देणाऱ्या आणि त्यांचा लाभ घेणाऱ्या क्षेत्रे / कंपन्यांमध्ये गुंतवणूक करण्यावर केंद्रित आहे.

# प्लॅस्टिक सर्जरीमुळे व्यंग असलेल्यांना नवा आत्मविश्वास देण्याचे काम

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन

नगर – प्रत्येक व्यक्ती आपला चेहरा, पेहराव, राहणीमानाप्रती खूप सजग असतो. कुणाला भेटायला जायचे असेल तर आधी तो आपला चेहरा आरशात पाहतो. अशावेळी चेहऱ्यावर व्यंग असल्यास त्याचा आत्मविश्वास कमी होतो. मनात न्यूनगंडाची भावना निर्माण होते. अशा लोकांच्या आयुष्यात प्लॅस्टिक सर्जरीने आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम भारतीय जैन संघटना मोफत शिबिरांच्या माध्यमातून करीत आहे. दुष्काळी परिस्थितीत मनपाच्या मालकीच्या पिंपळगाव तलावातील गाळ काढून पाणी साठवण क्षमता वाढविण्याचे महत्वाचे काम बीजेएसने केले. याशिवाय कोविड काळात करोनरा चाचणी, जिल्हा रूग्णालयातील आयसीयुचे आधुनिकीकरण करण्यातही या संघटनेने मोठे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.




स्वर्गीय पद्मश्री डॉ. शरदकुमार दिक्षित (अमेरिका) यांच्या स्मरणार्थ आयोजित मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीराचे उद्घाटन करताना आ.संग्राम जगताप

### नगरमध्ये २३ व्या मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबिराचे उद्घाटन

भारतीय जैन संघटना, अहिल्यानगर, श्री चांदमल मुनोत नेवासकर पब्लिक ट्रस्ट व अहिल्यानगर जिल्हा शासकीय रुग्णालय यांच्या विद्यमाने स्वर्गीय पद्मश्री डॉ. शरदकुमार दिक्षित (अमेरिका) यांच्या स्मरणार्थ आयोजित २३ व्या मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीराचे उद्घाटन आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. जिल्हा रूग्णालयाच्या तारकपूर येथील आयुष रूग्णालयात आयोजित या शिबिराप्रसंगी अमेरिकेतून आलेले प्लॅस्टिक सर्जन डॉ.राज लाला, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एन.एस.चव्हाण, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वैजीनाथ गुरवले, चांदमल मुनोत नेवासकर पब्लिक ट्रस्टचे किशोर मुनोत, बेंगलूर येथील डॉ.अमित बसनावर, गुजरात येथील डॉ.उज्वल भावसार, डॉ.मृदुला मुळे, बीजेएसचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य आदेश चंगेडिया, जिल्हाध्यक्ष प्रशांत गांधी, शिबीर प्रमुख अरूण दुगड, डॉ.नूतन फिरोदिया, डॉ.दीपा भळगट, सौ.प्रितम रांका, सौ.सुवर्णा डागा, संजय गुगळे, सौ. प्रियांका चंगेडिया, महेश गुंदेचा, केतन बलदोटा, सौ. सीमा मुनोत, महेश गुगळे, अजय फिरोदिया, सौ. कविता मुनोत, सौ. अर्चना सोळंकी, रोशन चोरडिया, निखिल बोथरा, प्रतीक जगदाळे, मंगेश घोडके आदींसह जिल्हा रूग्णालयाचे डॉ.भारती खणकर–पेचे, डॉ.शौनक मिरीकर, डॉ.मनोज घुगे, डॉ.संजय वाघ, डॉ.गणबोटे, डॉ.उज्वला शिरसाट, डॉ. देशमुख, डॉ. सोलट, डॉ.खेडकर, मेट्रन ज्योती लोंढे, असिस्टेन्ट मेट्रन छाया जाधव–निमसे, अजिंक्य पवार, अलका लकडे, कामिनी डापसे, सोनाली डिडवानीया आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात आदेश चंगेडिया यांनी सांगितले की, मोफत प्लॅस्टिक सर्जरी उपक्रमाचा गेल्या २२ वर्षात हजारो रूग्णांना लाभ झाला आहे. प्लॅस्टिक सर्जरी महागडी असते. सर्वसामान्यांना ती परवडत नाही. अशावेळी या रूग्णांच्या जीवनातही प्रकाश आणावा यासाठी या मोफत शिबिराचा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो. स्व. दिक्षित यांचे शिष्य डॉ. राज लाला, सौ. ललिता लाला सामाजिक बांधिलकीतून दरवर्षी नगरसह भारतात विविध भागात ही सेवा देतात. सर्जरीची सर्व सामग्रीही सुध्दा ते अमेरिकेतूनच आणतात. दरवर्षी नगरसह शेजारील जिल्ह्यातील रुग्ण या शिबिराचा लाभ घेतात. यंदाही या शिबिरात २०० हून अधिक रूग्णांची नोंदणी करण्यात आली. चांदमल मुनोत ट्रस्टचे हस्तीमल मुनोत यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर मुनोत यांचाही या शिबिरासाठी सक्रिय सहयोग असतो. जिल्हा रूग्णालयातील तत्पर स्टाफमुळे सर्व शस्त्रक्रिया अतिशय चांगल्या प्रकारे पाडल्या जातात.

डॉ.राज लाला म्हणाले, नगरमध्ये हे शिबीर घेताना नेहमीच विशेष आनंद होतो. भारतात अनेक ठिकाणी शस्त्रक्रिया करण्यासाठी जातो. पण नगरच्या जिल्हा रूग्णालयातील स्टाफसारखी समर्पित सेवा इतरत्र कुठेच पहायला मिळत नाही. त्यामुळे येथे तपासणी व शस्त्रक्रियाही अधिक प्रमाणात व चांगल्या पध्दतीने पार पडतात.

जिल्हा शल्य चिकित्स डॉ.चव्हाण म्हणाले, एखाद्या व्रताप्रमाणे बीजेएस, डॉ.राज लाला दरवर्षी प्लॅस्टिक सर्जरी शिबीर घेवून अनेकांच्या जीवनात नवी पहाट आणत आहेत. हरवलेला आत्मविश्वास पुन्हा देण्याचे मोठे काम या शिबिरातून सातत्याने होते. अशा उपक्रमांतून नगरची एक वेगळी ओळख सर्वत्र निर्माण होत आहे.

किशोर मुनोत म्हणाले, भारतीय जैन संघटनेचे मोफत सर्जरी शस्त्रक्रिया शिबिर हजारो लोकांच्या जीवनात नवीन प्रकाश आणण्याचे काम करीत आहे. या शिबिरासाठी ट्रस्टमार्फत सहकार्य करताना खूप समाधान लाभते. हस्तीमल मुनोत यांनी आचार्यश्रींची मानवसेवेची शिकवण कायम आचरणात आणली आहे. हीच शिकवण या कार्यास हातभार लावण्यासाठी प्रेरणा देत असते. या शिबिरामध्ये दुभंगलेले ओठ, चेहऱ्यावरील व्रण, नाक व कान यावरील बाह्यव्यंग, पापण्यातील विकृती अशा प्रकारच्या महागड्या शस्त्रक्रिया विनामूल्य करण्यात येणार येत आहेत.

प्रशांत गांधी यांनी आभार मानले.




## सावित्री ज्योती गौरव पुरस्काराने गणेश बनकर सन्मानित

शहरात झालेल्या सावित्री ज्योती महोत्सवात गणेश बनकर यांना राज्यस्तरीय सावित्री ज्योती गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. खा. निलेश लंके यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल बनकर यांचा अखिल भारतीय समता परिषदेच्या वतीने नगर तालुकाध्यक्ष रामदास फुले यांनी सत्कार केला. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष किशोर डागवाले, अ‍ॅड. शारदाताई लगड, सिनेकलाकार मोहनीराज गटणे, जयश्री शिंदे, जयश्री बनकर, महोत्सवाचे संयोजक अ‍ॅड. महेश शिंदे, नितीन डागवाले, संतोष विधाते, किशोर बनकर, ओंकार बनकर आदी उपस्थित होते.

## आनंद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

चांदेकर चेंबर्स, पानसरे गल्ली, अहमदनगर. फोन नं. ०२४१ – २३५६४५५

### सोनेतारण दागिन्यांच्या लिलावासंबंधी जाहीर नोटीस

खाली नमुद केलेल्या सोनेतारण कर्जदारांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की आपण संस्थेकडे सोन्याचे दागिने गहाण ठेऊन कर्जाऊ रक्कम घेतलेली आहे. सदर कर्जाच्या येणेबाकीची व्याजासह झालेली एकुण रक्कम करारनाम्याप्रमाणे आपण पतसंस्थेकडे भरलेली नाही.

| अ.क्र. | खाते क. | कर्जदाराचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| ०१ | १४७९९ | वाघमारे दिनेश मधुकर | घर नं– ६७३७, वाघगल्ली, नालेगाव, अ. नगर |
| ०२ | १४८२७ | शिंदे नानासाहेब गोपिनाथ | महादेव नगर, भुषण नगर, केडगाव, अ. नगर |
| ०३ | १४८३२ | शिंदे नानासाहेब गोपिनाथ | महादेव नगर, भुषण नगर, केडगाव, अ. नगर |
| ०४ | १५०६९ | खर्डे रविंद्र लक्ष्मण | चेतना कॉलनी, नवनागापुर, अ. नगर |
| ०५ | १५२१५ | खंडागळे स्वाती नवनाथ | शंभुराजे चौक, फ्लॅट नं. ४०५, आदिकैलास अर्पाटमेंट, एम. आय. डी. सी., अ. नगर |
| ०६ | १५२५० | सातपुते राजेंद्र बाबूराव | घर नं. ४४६१, नेप्ती गेट, टांगे गल्ली, अ. नगर |

संस्थेकडुन तुम्ही घेतलेल्या सोनेतारण कर्जाच्या उपरोक्त येणे बाकी रक्कमेची परतफेड उभयपक्षात झालेल्या करारनाम्याप्रमाणे तुम्ही निर्धारीत मुदतीत केलेली नसल्यामुळे उभयपक्षात झालेल्या सदर करारनाम्याचा भंग तुमच्याकडुन झालेला आहे त्यानंतर संस्थेने तुम्हाला याबाबत यापुर्वीच तुमच्या उपरोक्त पत्यावर रजिस्टर पोहोच पावतीने पोस्टाने नोटीस पाठविलेली आहे. संस्थेने पाठविलेल्या सदर नोटीसीस तसेच संस्थेने याबाबत तुम्हाला वेळोवेळी केलेल्या फोनला संस्थेस तुमचेकडुन कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. तरी संस्थेस तुमचेकडुन आज अखेर असणारी बाकीची संपूर्ण रक्कम तुम्ही संस्थेस त्वरीत भरणा करून तुमचे सोन्याचे दागिने संस्थेकडुन सोडवुन घ्यावेत किंवा संस्थेच्या नियमानुसार सदर कर्जखात्याचे त्वरीत नुतनीकरण करून घ्यावे.

तरी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसांच्या आत म्हणजे दि. ०३/०२/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत संस्थेस आजअखेर तुमचेकडुन येणे बाकी असलेल्या संपुर्ण रक्कमेची तुम्ही सुधारीत वाढीव मुदतीत परतफेड न केल्यास संस्थेच्या सोनेतारण कर्ज नियमानुसार व उभयपक्षात झालेल्या करारनाम्याप्रमाणे संस्थेकडे तुम्ही तारण ठेवलेले तुमचे सोन्याचे दागिने गुरूवार दि. ०३/०२/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजता संस्थेच्या नोंदणीकृत कार्यालयात जाहीर लिलावाने विक्री करण्यता येईल.

सदर लिलावात विक्री करण्यात येत असणाऱ्या तुमच्या दागिन्यांच्या विक्रीत संस्थेची व्याज मुद्दलासह व इतर खर्च धरून होणारी ईतर संपुर्ण एकत्रीत रक्कम सदर लिलावाच्या विक्रीतुन त्यावेळेस वसुल न झाल्यास त्यानंतर होणाऱ्या संभाव्य सर्व परीणामाची व उर्वरीत वसुलीची जबाबदारी तुमच्यावर राहील. त्यानंतर मात्र तुमची कोणतीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

दि. १६/०१/२०२५,
स्थळ – अहमदनगर

**श्री. दिपक शिंदे** – व्यवस्थापक
**सौ. अरूणा गोयल** – व्हा. चेअरमन
**श्री. अनिल सुराणा** – चेअरमन

## ‘रेणुका ट्रॅव्हल्स’तर्फे ३ ते ५ फेब्रुवारीदरम्यान अष्टविनायक दर्शन सहल

नगर – श्री रेणुका ट्रॅव्हल्सतर्फे खास लोकाग्रहास्तव ३ ते ५ फेब्रुवारी दरम्यान श्री अष्टविनायक दर्शन सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही ३ दिवशीय यात्रा आरामदायक बसने होणार आहे, अशी माहिती संचालक सौ. शुभांगी क्षीरसागर यांनी दिली.

श्री अष्टविनायक दर्शन सहलीसोबत देहू व आळंदी येथेही सहभागितांना घेऊन जाण्याचे नियोजन करण्यात आले आहे. २ बाय २ लक्झरी ४९ सीटर बसने ही सहल होणार असल्याने प्रवाश्यांना आरामशीर प्रवास करणे शक्य होईल. या सहलीसाठी श्री रेणुका ट्रॅव्हल्सची नेहमीची वैशिष्ट्यपूर्ण सेवा असणार आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वानुसार पर्यटकांना सहभागी करून घेतले जाणार आहे.

श्री अष्टविनायक दर्शन सहलीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी श्री रेणुका ट्रॅव्हल सर्व्हिसेस (यात्रा कंपनी) येथे शॉप नं. ३, नीलम प्रोव्हिजन स्टोअर्सशेजारी, डॉ. पानसंबळ हॉस्पिटलमागे, पोलिस कॉलनी, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे अथवा मोबाईल क्रमांक ९९२२२४०५१५, ९४०५०३२६९८ (श्यामकांत क्षीरसागर) आणि ८३७९८४१२६१, ९४०४४०१६९९ (सौ. दीपा जोशी) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ‘रोटरी’ वक्तृत्व करंडक स्पर्धेचे २७ जानेवारी रोजी आयोजन

नगर – रोटरी क्लब अहमदनगर मिडटाऊनच्या वतीने अहिल्यानगर शहरात रोटरी मिडटाऊन शालेय वक्तृत्व करंडक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दोन फेऱ्यांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेची प्राथमिक फेरी २८,२९ व ३० जानेवारीला होणार आहे. या फेरीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची अंतिम फेरी १ फेब्रुवारी रोजी होणार आहे. वक्तृत्व एक शास्त्र व उत्तम कला देखील आहे. या कलेच्या माध्यमातून श्रोत्यांना ज्ञान, प्रेरणा, आनंद आणि मानसिक प्रसन्नता मिळते. शालेय विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवा व त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा या उद्देशाने रोटरी क्लब अहमदनगर मिडटाऊनच्या वतीने अहिल्यानगर शहरात या स्पर्धेचे आयोजन केले आहे. शाळांनी व विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन मिडटाऊनचे अध्यक्ष रो.अजय पिसुटे यांनी केले आहे.

स्पर्धेची अधिक माहिती देताना क्लबच्या सचिव रो.मार्लिन एलिशा म्हणाल्या, शालेय वक्तृत्व करंडक स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये व तीन गटात होणार आहेत. लहान गट इ.१ ली ते ४ थी, विषय माझी सहल, माझे दप्तर व झाडांचे महत्त्व. मध्यम गट इ. ५ वी ते ७ वी विषय आमची वसुंधरा, खेळ की अभ्यास, मोबाईल की मैदान व आई रजेवर गेली तर. मोठा गट इ.८ वी ते १० वी विषय ‘बोर्ड परीक्षा हवी की नको’, ‘हसण्याचे महत्त्व’ व ‘ए आय शाप की वरदान’ तिन्ही गटातून विजेते निवडण्यात येणार असून त्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. तसेच प्राथमिक फेरीत सर्वाधिक स्पर्धक सहभागी करणाऱ्या शाळेस व अंतिम फेरीत सर्वाधिक पारितोषिक प्राप्त करणाऱ्या शाळेचा विशेष सन्मान पारितोषिक वितरण समारंभात होणार आहे.

स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नसून नाव नोंदणी आवश्यक आहे. त्यासाठी गुगल फॉर्म भरावा. अधिक माहितीसाठी अजय पिसुटे मो.नं. ९८५००७७७२२ व मार्लिन एलिशा मो.नं. ८४४६७५२४४७ येथे संपर्क साधावा.

## अहमदनगर तालुका नागरी सहकारी पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या. अहमदनगर

व्यापारी संकुल, पहिला मजला, गाळा नं. ४, महानगर बँकेशेजारी, मार्केटयार्ड, अहमदनगर, फोन : ०२४१ –२३२८२७६
जा.क्र./७२६/१ व २/कैलास पत /स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहीरनामा क्र. २ / सन २०२५ दि. ०८/०१/२०२५

### स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहीरनामा क्र.–२

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ (१) व (२) प्रमाणे) तसेच
(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (११) (ई) प्रमाणे

ज्या अर्थी कैलास नागरी सह. पत. मर्या. अहिल्यानगर यांनी खाली नमूद केलेल्या थकबाकीदारांविरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व (२) तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (११) (ई) प्रमाणे मला मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अहमदनगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरून मी एन.पी. दळवी विशेष वसुली व विक्री अधिकारी खालीलप्रमाणे जप्त केलेली स्थावर मालमत्ता थकित कर्ज रक्कम वसुलीकरिता जाहिर लिलावाने विक्री करीत आहे. तरी स्थावर मालमत्ता लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी खालील नमूद ठिकाणी, तारखेस व वेळेस उपस्थित रहावे.

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव | दाखला क्र. दिनांक | गाव | स्थावर मिळकत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वसुली दा. रक्कम | गट नं. | क्षेत्रफळ मिळकतीचे वर्णन | आकार रुपये. पै. |
| १. | श्री उस्मान बादशहा तांबोळी (कर्जदार) यांची स्वतःची मिळकत | १८८९/०९ --------- १७/१२/२००९ | अहिल्यानगर | ५६,२०४ + इतर खर्च+आदेशिका खर्च+३०/६/२००९ पासून २०% ने व्याज येणे | ३५६८ | २७.०० चौ.मी | |
| २. | शिल्पा शामराव कुलकर्णी, (कर्जदार) करिता जामीनदार विद्या विजय कावळे यांची मिळकत | १३८/१९ --------- ०२/०८/२०१९ | अहिल्यानगर | १,८८,११९ +इतर खर्च+आदेशिका खर्च+ १/४/२०१९ पासून २०% दराने व्याज येणे | ४२९२ | ३१.३५ चौ.मी | |

**चतुः सिमा मुळ नकाशाप्रमाणे**

**लिलावाचे ठिकाण :** अहमदनगर तालुका नागरी सहकारी पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर, दिनांक – १५/०२/२०२५ दुपारी १:०० वा.

**लिलावातील अटी व शर्ती :** १) कर्जदाराने कर्ज रक्कम पूर्ण भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. २) लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या ठिकाणी वाचून दाखविण्यात येतील. ३) लिलावात कोणासही बोली लावता येईल. ४) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्यांनी रु. २५,०००/– अनामत म्हणून आदेश प्रसिध्द झालेपासून ते लिलावाचे एक दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात भरावी लागेल. त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. ५) लिलाव मंजूर किंवा नामंजुर करण्याचा अधिकार सही करणार वसुली अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे. ६) अन्य अटी व शर्ती लिलावाच्या वेळी वाचून दाखवण्यात येईल. ७) लिलावाच्या सविस्तर अटी व शर्ती संस्थेच्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात पहावयास मिळतील. ८) लिलाव स्थगित करणे, रद्द करणे, पुढे ढकलणे इ. अधिकार मे. विशेष वसुली अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत. ९) सदर मिळकतीवरील दाव्याविषयी अथवा इतर कोणत्याही तिऱ्हाईत इसमाने दावा केलेले हक्क, दावा अथवा हितसंबंध याबाबत कशाचाही खरेपणाबद्दल हमी दिलेली नाही.

स्थळ : अहिल्यानगर
दिनांक : ०८/०१/२०२५

शिक्का

सही/–
**एन. पी. दळवी**
विशेष वसुली व विक्री अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)



माऊंट सिनायच्या वार्षिक क्रीडा सप्ताहास उत्साहात प्रारंभ झाला.

## माऊंट सिनायच्या क्रीडा सप्ताहास प्रारंभ

नगर – सारोळाबद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलच्या वार्षिक क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. उद्घाटनप्रसंगी क्रीडा अधिकारी विशाल गर्जे उपस्थित होते.


यावेळी खाशाबा जाधव यांच्या जयंती निमित्ताने प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून राज्य क्रीडा दिन देखील साजरा करण्यात आला. विद्यालयातील इयत्ता चौथीच्या परीनिका शिंदे, स्वरा वांढेकर, रुद्र गुंड, स्वराज इंगळे, आरोही गायकवाड, प्रांजल शेडाळे, दर्शन शिंदे या विद्यार्थ्यांनी खाशाबा जाधव यांचा जीवनपट उपस्थितांना विदित केला.

प्रारंभी विद्यालयातील खेळाडूंनी प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. परेडचे नेतृत्व कुमारी सृष्टी पोकळे हिने तर मयुरेश चव्हाण, अजिंक्य कंठाळे, कृष्णा बनकर व साक्षी राठोड यांनी अनुक्रमे छत्रपती शिवाजी कंपनी, किंग डेव्हिड कंपनी, छत्रपती संभाजी कंपनी व राणी लक्ष्मीबाई कंपनी यांचे नेतृत्व केले.

विशाल गर्जे यांनी खेळाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगून प्रत्येकाने आपल्या आवडीचा एकतरी खेळ खेळला पाहिजे, असे प्रतिपादन केले. या क्रीडा सप्ताहात वैयक्तिक व सांघिक खेळ खेळले जाणार असून त्यामध्ये मैदानी खेळ, कब्बडी, खो खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल व रस्सीखेच यांचा समावेश आहे. कार्यक्रमास मुख्याध्यापिका जयश्री खरात, क्रीडा शिक्षक किशोर उबाळे व शिक्षिका उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका बानिया यांनी केले. सविता पाटोळे यांनी परिचय करून दिला तर नेहा केदारे यांनी आभार मानले.

# अहमदनगर जिल्ह्यातील नवीन व्यापाऱ्यांना 'जीएसटी' नोंदणी करताना येणाऱ्या तांत्रिक अडचण दुरुस्त कराव्यात

नगर – राज्य शासनाकडून राज्यातील काही जिल्ह्यांची नावे बदलण्यात आली. औरंगाबादचे नाव संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव आणि त्याचप्रमाणे अहमदनगरचे अहिल्यानगर अशी नावे बदलण्यात आली आहेत. त्याप्रमाणे शासकीय गॅझेट निघाले आणि त्या त्या ठिकाणी अहमदनगर ऐवजी अहिल्यानगर नावाच्या नोंदी शासन दरबारी लागल्या. अहमदनगरचे नाव अहिल्यानगर झाल्यामुळे सहाजिकच जीएसटी कायद्यानुसार जीएसटी पोर्टलवर सुद्धा अहमदनगरचे नाव अहिल्यानगर असल्याचा उल्लेख दिसू लागला.



यामध्ये एक महत्त्वाची अडचण निर्माण झाली आहे. ज्यावेळेस एखाद्या व्यापाऱ्याला जीएसटी कायद्यानुसार नोंदणी दाखला घ्यावा लागतो, अशावेळी तो दाखला जीएसटी पोर्टलवर ऑनलाईन माहिती भरून व कागदपत्रांच्या नकला जोडून तो अर्ज ऑनलाईन दाखल करायचा असतो. असा अर्ज दाखल करताना पोर्टलवर अर्जदाराने सर्वप्रथम त्याची व्यवसायाची माहिती भरायची असते. ही माहिती भरत असताना त्यामध्ये राज्याचे नाव महाराष्ट्र व त्यापुढे जिल्हा कॉलम मध्ये पोर्टलवर नमूद केलेल्या जिल्ह्यातून एका जिल्ह्याची नोंद करायची असते. त्यामध्ये अगोदरच पोर्टलवर अहमदनगर ऐवजी अहिल्यानगर नावाचा उल्लेख असल्यामुळे, साहाजिकच अर्जदाराला अहिल्यानगर नावावर टिक मारावी लागते व पुढच्या विंडोमध्ये म्हणजेच प्रमोटर किंवा पार्टनर यांची व्यक्तिगत माहिती आणि रहिवासाच्या जागेचा पत्ता लिहिण्यासाठी माहिती सादर करावी लागते, अशावेळी ही माहिती सादर करत असताना त्या ठिकाणी पुन्हा अर्जदाराचा रहिवासाच्या पत्त्याचा जिल्हा कोणता ? अशी विचारणा केली जाते. त्या ठिकाणावर मात्र पोर्टलवर अहिल्यानगर ऐवजी अहमदनगर असे जिल्ह्याचे नाव देण्यात आलेले आहे त्यावर टिक केल्यानंतर अर्जदाराचा अर्ज पुढे जात नाही. व इथे अर्ज सादर करण्याची प्रक्रिया थांबते.

अर्ज पुढे न गेल्यामुळे त्याला त्याची इतर माहिती पोर्टलवर नोंदणी दाखला मिळण्यासाठी सादर करता येत नाही ही एक मोठी अडचण निर्माण झालेली आहे. सदरची अडचण ही तांत्रिक स्वरूपाची आहे. यासाठी अनेक करसल्लागार, सीए यांनी त्यांच्याकडील नोंदणी प्रकरणाबाबत ग्रीव्हियन्सकडे तक्रार करून देखील अद्याप पर्यंत ग्रिव्हीयन्सकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही वा खुलासा होऊ शकलेला नाही त्याला उत्तर मिळालेले नाही, त्यामुळे केवळ वाट बघण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही. नासिक व नगर कार्यालयाशी या बाबत संपर्क साधून देखील अद्याप हा दोष दुरुस्त होऊ शकलेला नाही, असे नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष नितीन डोंगरे यांनी म्हटले आहे.



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या शिष्टमंडळाने अमृता देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत सागर निवासस्थानी भेट घेतली.

## अमृता फडणवीस यांना निमंत्रण

नगर – जगभरात १४३ देशात ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या शिष्टमंडळाने अमृता देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत सागर निवासस्थानी भेट घेतली. यावेळी वरिष्ठ राजयोग शिक्षिका बी के रुक्मिणी दीदी यांनी संस्थे द्वारा जगभरात शिकविल्या जाणाऱ्या राजयोग ध्यान पध्दती बद्दल माहिती देऊन संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय माऊंट आबूला भेट देण्याचे निमंत्रण दिले. यावेळी वरिष्ठ राजयोग शिक्षिका बी के वंदना दीदी व बी के डॉ. दीपक हरके उपस्थित होते.

## रोज पाणीपुरवठा करावा आणि मगच दरवाढ करावी अन्यथा नागरिकांसह तीव्र आंदोलन

नगर – अहिल्यानगर शहरातील नागरिकांना रोज पाणी पुरवठा करावा आणि मगच पाणीपट्टीत वाढ करावी अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल. असा इशारा माजी स्थायी सभापती अविनाश घुले यांनी मनपा प्रशासनाला दिला आहे.



अविनाश घुले

मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी मनपाच्या पाणीपट्टीत वाढ करण्याचा निर्णय घेतला तो तातडीने त्यांनी मागे घ्यावा सदर दरवाढ अन्यायकारक असून प्रशासनाने आधी नियमित आणि पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करावा. सध्या शहराला वर्षातून फक्त सहा मंहिने पाणी पुरवठा होतो आणि तो सुद्धा पूर्ण दाबाने पाणी मिळत नाही. अशा परिस्थितीत पाणी पटटीवाढ करणे चुकिचे आहे. आजही नगर मधील नागरिकांना पाणी पुरेशा व मुबलक प्रमाणात मिळत नाही. सामान्य नागरिक तर पूर्ण वर्षांची पाणीपट्टी भरतात. काही उपनगर मधील भागात तर आठ आठ दिवस पाणी मिळत नाही याचाही विचार प्रशासनाने करणे गरजेचे असल्याचे मत अविनाश घुले यांनी व्यक्त केले.

घुले पुढे म्हणाले कि वास्तविक पाहता मनपामध्ये सध्या प्रशासक राज आहे त्यामुळे जनतेचे प्रश्न मांडणारे नगरसेवक त्याठिकाणी नसल्यामुळे प्रशासनाने तातडीने पाणीपट्टी वाढ जाहीर करून मोकळे झाले. १५०० रूपयांवरून थेट ३००० रूपये करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. ही दरवाढ सामान्य जनतेसाठी अन्यायकारक आहे. मनपाने सर्वात प्रथम नियमित व पुरेशा दाबाने सर्वांना समान पाणीवाटप होईल यादृष्टीने पावले उचलली पाहिजेत. आणि त्यानंतर त्यांना पाणीपट्टीचा विचार करणे गरजेचे आहे. नाहीतर नागरिकांसह तीव्र स्वरूपाचे आंदोलन करावे लागेल असा इशारा त्यांनी दिला आहे.

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जात प्रमाणपत्र पडताळणी विशेष मोहिम

नगर – इयत्ता १२ वी विज्ञान शाखेमध्ये शिक्षण घेत असलेल्या मागावर्गीय विद्यार्थ्यांसाठी जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. जात प्रमाणपत्र पडताळणीचा अर्ज दाखल न केलेला विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज दाखल करुन या मोहिमेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी उपायुक्तांनी केले आहे. यापूर्वी जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी ३१ डिसेंबर, २०२४ ही मुदत देण्यात आली होती. परंतू राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या १०० दिवसांच्या उद्दिष्ट कार्यक्रमानूसार ही विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीचे अर्ज सीसीव्हीआयएस अथवा www.barti.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सादर करुन त्याची प्रत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयात दाखल करावी.

# पाणीपट्टी वाढ लागू करण्याचा निर्णय महानगरपालिकेने तात्काळ रद्द करावा

### शिवसेनेचे आयुक्तांना निवेदन

नगर – महापालिकेने सर्वसामान्य नागरिकांकडून दुपटीने पाणीपट्टी लागू करण्याचा निर्णय महापालिकेने रद्द करावा मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. शिवसेनेच्या शिष्टमंडळाने मनपा आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन सदर मागणीचे निवेदन दिले. तर वाढ करण्यात आलेली पाणीपट्टी अन्यायकारक असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.



महापालिकेने सर्वसामान्य नागरिकांकडून दुपटीने पाणीपट्टी लागू करण्याचा निर्णय महापालिकेने रद्द करावा अशा मागणीचे निवेदन आयुक्त यशवंत डांगे यांना शिवसेनेच्यावतीने देताना शहर प्रमुख सचिन जाधव आदी.

यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख सचिन जाधव, काका शेळके, आकाश कातोरे, अमोल हुंबे, प्रल्हाद जोशी, दिगंबर गेंट्याल, विशाल शितोळे, पुष्पाताई येलवंडे, सलोनीताई शिंदे, सचिन शिरसाठ आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

स्थायी समितीच्या वतीने ७ जानेवारी रोजीच्या ठरावाने महानगरपालिका हद्दीतील सध्याची वार्षिक पाणीपट्टी दीड हजार वरुन दुप्पट करून तीन हजार करण्यात आलेली आहे. सदरच्या वाढीव पाणीपट्टीमुळे सर्वसामान्य नागरिकांवर फार मोठा बोजा पडणार आहे. अजून नगर शहराची फेज टू पाणी योजना पूर्णत्वास गेलेली नाही. ही पाणी योजना चालू करण्यात आली नसून, बऱ्याच लोकांच्या पाणी प्रश्ना संदर्भातील वारंवार तक्रारींना नगरसेवकांना तोंड द्यावे लागते. नागरिकांच्या रोषाला देखील सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीमध्ये काही कारण नसताना दुपटीने पाणीपट्टी वाढविणे ही बाब अन्यायकारक असल्याचे शिवसेनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

सर्व बाबींचा विचार करून वाढीव पाणीपट्टीचा मंजूर केलेला ठराव तात्काळ रद्द करण्यात यावा. अन्यथा मोठ्या प्रमाणात जनआंदोलन करण्याचा इशारा शिवसेनेच्या वतीने देण्यात आला आहे.

शहरात दुपटीने पाणीपट्टी वाढचा निर्णय अन्यायकारक आहे. फेज टू ची योजना कार्यान्वीत नसताना व अनेक भागात पुरेश्या प्रमाणात पाणी येत नसताना ही वाढ करण्यात आली आहे. या निर्णयाचा गांभीर्याने विचार करुन, सर्वसामान्य नागरिकांवर कराचा बोजा टाकणे चूकीचे ठरणार आहे. पाणी हे सर्वसामान्यांना गरजेचे असून, त्यासाठी अव्वाच्यासव्वा वसुलीचा निर्णय रद्द करण्यात यावा अशी मागणी – सचिन जाधव यांनी केली आहे.

## व्यापाऱ्याच्या दुकानातून लाखोंच्या रोकडची चोरी

नगर – व्यापाऱ्याच्या दुकानाच्या गॅलरीतून आत प्रवेश करत अज्ञात चोरट्याने दुकानातील २ लाख ८० हजारांची रोकड चोरून नेल्याची घटना मंगलगेट परिसरातील जे.जे. गल्ली येथील शिवशक्ती ट्रेडिंग या दुकानात घडली आहे.

याबाबत दुकान मालक दीपक टेकचंद आहुजा (रा. मकासरे हेल्थ क्लब समोर, सिव्हील हडको) यांनी १५ जानेवारीला दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे मंगलगेट परिसरातील जे.जे. गल्ली येथे शिवशक्ती ट्रेडिंग नावाचे गोळ्या, बिस्किटे व सिगारेटचे होलसेल विक्रीचे दुकान आहे. ३० डिसेंबर रोजी रात्री ९.३० च्या सुमारास त्यांनी दुकान नेहमीप्रमाणे बंद केले व ते घरी गेले. ३१ डिसेंबर जवळ असल्याने दुकानाचा सेल जास्त होता, त्यामुळे दुकानात रोख रक्कमही जास्त होती. त्यांनी २ लाख ८० हजारांची रोकड दुकानात ठेवलेली होती.

दुसऱ्या दिवशी ३१ डिसेंबर असल्याने ते कुटुंबासह सोनेवाडी रोड वरील रानवारा येथे हुरडा पार्टीला गेले होते. त्यामुळे दिवसभर दुकान बंद होते. सायंकाळी ७.३० च्या सुमारास फिर्यादी आहुजा हे दुकानात गेले असता त्यांना दुकानातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यांनी दुकानात ठेवलेली रोकड तपासली असता ती दिसून आली नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने दुकानाच्या गॅलरीतून आत प्रवेश करत दुकानातील साहित्याची उचकापाचक केली. तसेच २ लाख ८० हजारांची रोकड चोरून नेल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# अहिल्यानगरच्या तारकपूर एस.टी. स्टॅण्डला लोकशाहीर आण्णभाऊ साठे यांचे नाव द्यावे

### केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांना निवेदन

नगर – अहिल्यानगर हे जिल्ह्याचे ठिकाण असून या ठिकाणी माळीवाडा, पुना बस स्टॉप, आणि तारकपुर एस.टी. स्टॅण्ड अशा नावाने ओळखलं जाते. पैकी तारकपूर भागातील स्टॅण्डला लोकशाहीर आण्णाभाऊ साठे बसस्थानक असे नामकरण करण्याबाबत निर्णय घ्यावा अशी मागणी केंद्रीय नागरी उड्डाण आणि सहकार राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडें भारतीय जनता पार्टी दलित अहिल्यानगर सरचिटणीस राजेंद्र घोरपडे यांनी निवेदनाव्दारे केली आहे.



तारकपूर भागातील स्टॅण्डचे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे बसस्थानक असे नामकरण करण्याच्या मागणीचे निवेदन केंद्रीय नागरी उड्डाण आणि सहकार राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांना देताना राजेंद्र घोरपडे, अशोक भोसले, शितल गाडे, येशुदास वाघमारे, सुनंदा कांबळे, बाबासाहेब चांदणे आदी.

अहिल्यानगर शहरात सावेडी भागात लोकसंख्या वाढलेली असून त्या जवळच तारकपूर हे मोठे असे बसस्थानक असून तेथून जिल्हा आणि परराज्यात बस ये जा करतात अशा मोठ्या बसस्थानकास मोठ्या माणसाचे नाव देणे योग्य ठरेल. २०/०५/२०१७ रोजी जिल्हाधिकारी, एस.टी महामंडळ यांना निवेदन देण्यात आले होते. आत्तापर्यंत या गोष्टीचा गांभीर्याने कोणीही विचार केलेला नाही. तेव्हा तारकपूर मधील बसस्थानकास लोकशाहीर आण्णाभाऊ साठे बसस्थानक असे नाव देण्यात यावे, असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी आ.संग्राम जगताप, भारतीय जनता पार्टी दलित अहिल्यानगर शहर सरचिटणीस राजेंद्र घोरपडे, अशोक भोसले, शितल गाडे, येशुदास वाघमारे, सुनंदा कांबळे, बाबासाहेब चांदणे आदी उपस्थित होते.

१ ऑगस्ट रोजी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती असून जयंतीच्या औचित्याने हा निर्णय लवकरात लवकर घेण्यात यावे, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

## पतंग कापल्याच्या कारणावरून भिंगारमध्ये एकास बेदम मारहाण

### तिघांविरुद्ध पोलिसांनी केला गुन्हा दाखल

नगर – मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवताना पतंग कापल्याच्या कारणावरून राग आल्याने तिघांनी एकास शिवीगाळ दमदाटी करीत लाकडी दांडक्याने, लाथा बुक्क्यांनी व हाताने बेदम मारहाण केली. ही घटना भिंगार येथील सौरभनगर येथे १४ जानेवारी रोजी सायंकाळी ७.३० च्या सुमारास घडली.

याबाबतची माहिती अशी की आशिष अशोक क्षेत्रे (वय २७, रा. सौरभ नगर, भिंगार) हे मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवीत असताना त्यांच्या कडून एकाचा पतंग कापण्यात आला. याचा राग आल्याने पांड्या मेंबरचा मुलगा गोरख (पूर्ण नाव माहित नाही. रा. वडारवाडी, म्हस्के हॉस्पिटल समोर, भिंगार) व त्याचे दोन अनोळखी साथिदार यांनी आशिष क्षेत्रे यांना शिवीगाळ केली. यावेळी तुम्ही शिवीगाळ का करता असे क्षेत्रे समजून सांगण्याचा प्रयत्न करीत असताना त्या तिघांनी त्यांना शिवीगाळ करीत लाकडी दांडक्याने, लाथाबुक्क्यानी बेदम मारहाण केली.

याप्रकरणी आशिष क्षेत्रे यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी तिघांविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ११८ (१), ११६ (२), ३५१ (२), ३५२, ३ (६) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## दिव्या धावडे, दिव्या पोळ व रूपाली शिंदे यांची महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड



नगर – येथील जय मल्हार आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलमधील तीन महिला कुस्तीपटूंची वर्धा येथे होणाऱ्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. दिव्या भाऊसाहेब धावडे ही महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत नगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

नुकतेच पार पडलेल्या निवड चाचणीत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या दिव्या भाऊसाहेब धावडे (५३ किलो वजन गट), दिव्या चंद्रकांत पोळ (६८ किलो वजन गट) व रूपाली वसंता शिंदे (५० किलो वजन गट) या महिला कुस्तीपटूंची सदर स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दिव्या पोळ सातारा जिल्ह्याचे तर रूपाली शिंदे हिंगोली जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. नुकतेच लखनऊ येथे झालेल्या ऑल इंडिया इंटर साई कुस्ती स्पर्धेत रुपाली शिंदे हिने रौप्य पदक पटकाविले आहे. तिन्ही कुस्तीपटू जय मल्हार आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलात वस्ताद भाऊसाहेब धावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे.

## कंपनीसमोरून बॅटऱ्यांची चोरी

नगर – एमआयडीसी येथील सी.जी. पॉवर कंपनीसमोरून अज्ञात चोरट्यांनी १५ हजार रुपयांच्या पाच बॅटऱ्या चोरून नेल्या. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संदीप आनंदा कालेकर (वय ४२, रा. बोल्हेगाव फाटा) यांनी फिर्याद दिली आहे. १२ जानेवारी रोजी रात्री ते १३ जानेवारी रोजी सकाळच्या दरम्यान ही घटना घडली.

अधिक तपास पोलिस करत आहेत.

## सावेडी उपनगरातील न्यायालयीन कर्मचाऱ्याच्या घरातून भरदिवसा चोरी; दागिन्यांसह रोकड लंपास

नगर – जिल्हा न्यायालयात नोकरीस असलेल्या नोकरदाराचे घर अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा फोडून घरातील कपाटातील सुमारे ५३ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरून नेला. ही घटना सावेडीतील दसरेनगर येथील शिव वसुदा रेसीडेन्सी येथे १५ जानेवारी रोजी दुपारी ३ ते ५ वाजण्याच्या दरम्यान घडली.

नगरच्या वरिष्ठ स्तर दिवानी न्यायालयात स्टेनोग्राफर म्हणून कार्यरत गणेश सुधाकर मंचरकर (वय ४२, रा. फ्लॅट क्र. २०२, शिववसुदा रेसीडेन्सी, दसरेनगर, सावेडी) हे १५ जानेवारी रोजी सकाळी नेहमी प्रमाणे ड्युटीवर गेले होते. त्यांची पत्नी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास त्यांच्या वरच्या फ्लॅट मधील शेख यांचेकडे गेल्या. व पुन्हा सायंकाळी सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास परत घरी आल्या. असता त्यांना घराच्या दरवाजाचे लॉक तुटलेले दिसुन आले. त्यांनी घरात जाऊन पाहीले असता त्यांना घरातील बेडरुम मधील कपाट हे उघडलेले व त्यातील कपडे खाली अस्तव्यस्त पडलेले दिसले. त्यांनी त्यांचे पती गणेश मंचरकर यांना फोन करून लवकर घरी येण्यास सांगितले.

मंचरकर यांनी घरी येवुन पाहिले असता घरातील कपाटात ठेवलेले १० ग्रॅम वजनाचे गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र, १६ ग्रॅम वजनाचे गळ्यातील सोन्याचे मिनीगंठण, ३ ग्रॅम वजनाची एक सोन्याची अंगठी, ४ ग्रॅम वजनाची कानातील लटकन, २ हजार रुपये रोख रक्कम असा सुमारे ५३ हजार रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या प्रकरणी गणेश मंचरकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ३३१ (१),३०५ (अ) अन्वये गुन्ह्याची नोंद केली असून तपास पोलीस हवालदार गांगर्डे करीत आहे.

## आकडा टाकून घरात वीजचोरी करणाऱ्यावर गुन्हा दाखल

नगर – गेल्या वर्षभरापासून तारेवर आकडा टाकून घरात सुरु असलेली वीजचोरी महावितरणच्या पथकाने पकडली आहे. सुमारे १७ हजार ७६५ रुपये किमतीची ९४१ युनिट वीज चोरी करणाऱ्या घरमालकाविरुद्ध नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रतन भाऊ घोडके (रा.घोसपुरी, ता.नगर) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

याबाबत महावितरणच्या सारोळा कासार शाखा कार्यालयातील कनिष्ठ अभियंता संदीप विठ्ठल बराट (वय ४२, रा. देहरे ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे.

## अभिवाचन स्पर्धेत हिंदवी शिंदे द्वितीय

नगर – शहर स्तरावर घेण्यात आलेल्या अभिवाचन स्पर्धेत हिंदवी शिंदे या विद्यार्थ्यांनीने द्वितीय क्रमांक पटकावला. शिशु विहार संस्थेच्या संचालिका सुनिता देव यांच्या माध्यमातून अभिवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



याप्रसंगी त्यांनी सांगितले की हिंदवी शिंदे हीने या स्पर्धेत अतिशय उत्कृष्ट सादरीकरण केले. बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेत इयत्ता तिसरीत शिकणारी हिंदवी वकृत्व स्पर्धा, वाचन स्पर्धा, भाषण स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन नेहमीच उत्कृष्ट सादरीकरण करत असते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे तसेच स्वाती देशमुख यांच्या हस्ते हिंदवीस प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

हिंदवीस तिची आई भाग्यश्री शिंदे, आकाश शिंदे, साई मोरे, गौरव मोरे, ललित वाकचौरे, कांतीलाल खुरंगे यांचे मार्गदर्शन लाभले. हिंदवी शिंदे ही स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांची ती कन्या आहे.

## चंदन प्लॅस्टिक येथे १७ जानेवारी रोजी युवाचार्य महेंद्रऋषीजी व साधू-संतांचे आगमन

नगर – राष्ट्रसंत आचार्यसम्राट आनंदऋषीजी म.सा. यांचे शिष्य आचार्य ध्यानयोगी शिवमुनीजी म.सा. यांचे अज्ञानुवर्ती, भावी अनुशास्ता, प्रज्ञा महर्षी श्रमण संघीय युवाचार्य भगवंत महेंद्रऋषीजी म.सा., हितमितभाषी हितेंद्रऋषीजी म.सा., नवदीक्षित धवलऋषीजी म.सा. आदी ठाणा ३ यांचे चिंचोडी पाटील येथून १७ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता चंदन प्लॅस्टिक, विश्वभारती कॉलेजच्या मागे, सारोळाबद्दी, जामखेड रोड, अहिल्यानगर येथे मंगल आगमन होत आहे. या मंगलप्रसंगी समाजबांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन रमेश गुंदेचा व परिवाराने केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

